cmyk

## संपादकीय

### दोन्ही बाजुंच्या समर्थकांमध्ये संभ्रम कायम!

शिवसेना (उबाठा) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा ५ जुलै रोजी मुंबईत झालेला मेळावा केवळ मराठीच्या मुद्यावर होता, तो राजकीय मेळावा नव्हता, असे वक्तव्य मनसेचे नेते राज ठाकरे यांनी केल्याचे वृत्त काही माध्यमांनी दिले. त्याचे राज ठाकरे यांनी जोरदार खंडन केले आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेशी युतीबाबत आपण कोणतेही वक्तव्य केलेले नाही, माध्यमांच्या एका गटाने आपल्या तोंडून न आलेली वाक्ये टाकली आहेत,


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–८४ | शनिवार, दि.१९ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### २४ तासात तीन क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी

नवी दिल्ली–भारताने २४ तासात ३ अति पावरफुल क्षेपणास्त्रांची चाचणी घतेली आहे. भारताच्या या क्षेपणास्त्र चाचणीमुळे जागाला धडकी भरली आहे. भारताने आकाश प्राइम, अग्नि–१ आणि पृथ्वी–२ या ३ क्षेपणास्त्रांची यशस्वी चाचणी घेतली. भारताच्या या मिसाईल टेस्टमुळे जगाला धडकी भरली आहे. तर, पाकिस्तानची बोबडी वळाली आहे.

## थोडक्यात...

### आव्हाड यांच्याविरुद्ध एफआयर दाखल

मुंबई– गुरुवारी विधान भवनात झालेल्या हाणामारीनंतर जितेंद्र आव्हाड यांनी विधान भवनाबाहेर धरणे आंदोलन केले, त्यानंतर त्यांना मरीन ड्राइव्ह पोलिस स्टेशनमध्ये नेण्यात आले. तिथेही त्यांनी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी गोंधळ घातला, त्यानंतर मुंबई पोलिसांनी आता पोलिसांच्या कामात अडथळा आणण्याच्या कलमाखाली गुन्हा दाखल केला आहे.

### दहशतवादी विरोधी बिल असेल तर पाठिंबा–ठाकरे

मुंबई–विधानभवनात मारमारी करणारे कडवे डावे की कडवे उजवे होते, असा प्रश्न उपस्थित करत उद्धव ठाकरे याने जनसुरक्षा विधेयकावर तोंडसुख घेतले आहे. विधेयकात स्पष्टता आणावी असंही त्यांनी ठणकावून सांगितले. इतकेच काय तर दहशतवादी विरोधी बिल असेल तर आमचा पाठिंबा असेल असेही उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

### अवैध भोंगे आढळल्यास कारवाई होणार–मुख्यमंत्री

मुंबई– अवैध भोंगे आढळल्यास कारवाई होणार, असे फडणवीस विधानसभेत म्हणाले. राज्यात गेल्या अनेक महिन्यांपासून अवैध भोंग्यांचा मुद्दा चर्चेत आहेत. अशात आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या अवैध भोंग्यांवरुन भाष्य केले आहे.

### पोलिसांच्या १३ हजार जागा भरण्यात येणार

मुंबई–राज्यात ३० हजार ८०२ पोलिसांची भरती केली, हा रेकॉर्ड असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. तसेच पोलिसांच्या अजुनही १३ हजार जागा भरण्यात येणार असल्याची माहितीही मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत बोलताना दिली आहे.

### कुंदाताई काळेंनी घेतली ज्ञानेश्वरी मुंडेंची भेट

बीड–ज्ञानेश्वरी मुंडेंवर विष प्राशन केल्याने जिल्हा रुग्णालयातील अतिदक्षता विभागात उपचार सुरु आहेत. २० महिन्यांपुर्वी झालेल्या महादेव मुंडे हत्या प्रकरणातील आरोपींना अटक करण्याची मागणी करत त्यांनी विष प्राशन केले होते. आता मराठा क्रांती मोर्चाच्या कुंदाताई काळेंनी जिल्हा रुणालयात जाऊन ज्ञानेश्वरी मुंडेंची भेट घेतली आहे.

### मला जास्त बोलायला लावू नका–आ.पडळकर

मुंबई–मला सूचना आहेत म्हणून मी शांत आहे, त्याचा वेगळा अर्थ घेऊ नका. मला जास्त बोलायला लावू नका, असा इशारा गोपीचंद पडळकर यांनी दिला आहे.

### जितेंद्र आव्हाड समर्थकांकडून शक्तिप्रदर्शन

मुंबई –विधान भवनात घडलेल्या घटनेचा निषेध करत, शरद पवार गटाचे नेते जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांनी गुरुवारी पुन्हा विधान भवनाबाहेर मोठ्या संख्येने शक्तिप्रदर्शन केले. आव्हाड यांचे हजारो समर्थक, संतप्त पदाधिकारी देखील यात सहभागी होते.

### ज्वारीच्या दरात ११०० रुपयांची वाढ

जळगाव –बाजार समितीत ज्वारीला ३ हजार ३७१ रुपये क्विंटल एवढा भाव मिळाला आहे. तीनच दिवसात ज्वारीच्या दरात ११०० रुपयांची वाढ झाली आहे. जळगाव बाजार समितीमध्ये २२०० रुपये क्विंटल एवढा भाव असलेल्या ज्वारीचा दर ३ हजार ३७१ रुपयांवर पोहोचला आहे.

### आ. रोहित पवारांची पोलिसांना दमबाजी

मुंबई: आमदार रोहित पवारांचा पोलिसांना दमबाजी करतानाचा एक व्हिडीओ समोर आला असून कार्यकर्त्याला ताब्यात घेतल्यानंतर थेट पोलीस ठाण्यात धाव घेत त्यांनी थेट पोलिसांनाच दमदाटी केली आहे. यावेळी कार्यकर्तेही आक्रमक झाल्याचे दिसून येत आहे.

# मोदींचे पैसे कधी येणार? २० व्या हप्त्याची अजूनही प्रतिक्षा

## शेतकऱ्यांकडून बँकेत चकरा; नमोचा हप्ताही कधी मिळणार

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

**पीएम किसानच्या २० व्या हप्त्याची शेतकऱ्यांना प्रतीक्षा असून गेल्या काही दिवसांपासून १८ जुलै रोजी शेतकऱ्यांच्या खात्यात २० व्या हप्त्याचे २००० रुपये जमा होतील अशा चर्चा होत्या. मात्र, आज शेतकऱ्यांच्या खात्यात पीएम किसान सन्मान निधी योजनेचे २००० रुपये जमा झालेले नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांना २० व्या हप्त्यासंदर्भात आणखी वाट**




**पाहावी लागेल. तर राज्य सरकारच्या नमो शेतकरी योजनेचे सुध्दा पैसे कधी मिळतात याकडे शेतकऱ्यांचे लक्ष आहे.**

प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेद्वारे शेतकऱ्यांना एका वर्षात ६ हजार रुपये दिले जातात. आतापर्यंत शेतकऱ्यांना १९ हप्त्यांचे २००० रुपयांप्रमाणं पैसे देण्यात आले आहेत. आता पीएम किसान सन्मान निधीच्या २० व्या हप्त्याची रक्कम कधी मिळते याकडे शेतकऱ्याचे लक्ष लागले आहे. पीएम पान २ वर

### २० व्या हप्त्यासाठी ई केवायसी आवश्यक


पीएम किसान सन्मान निधी योजनेचा २० वा हप्ता मिळावा म्हणून शेतकऱ्यांनी ई केवायसी प्रक्रिया पूर्ण केलेली असणे आवश्यक आहे. बँक खाते आधार लिंक असावे. बँक खात्याच्या माहितीची पडताळणी केलेली असावी. शेतकऱ्याच्या नावावर जमीन असणे आवश्यक आहे. पीएम किसान सन्मान निधीच्या वेबसाईटवर जाऊन बेनिफिशिअरी स्टेटसची तपासणी करावी. याशिवाय ओटीपी आणि नोटिफिकेशनसाठी मोबाईल क्रमांक अपडेट करावा.

# महादेव मुंडे हत्याप्रकरण विधानसभेत गाजले

## फडणवीसांनी घेतले मनावर; ८३ साक्षीदार, २८६ लोकांकडे मोबाईलद्वारे तपासणी

**बीड । प्रतिनिधी**

**परळीतील महादेव मुंडे हत्या प्रकरणावर शुक्रवारी सभागृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माहिती दिली. मोठ्या प्रमाणात या प्रकरणाचा तपास सुरु आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून १९६ जणांची विचारणा केली आहे. तसेच ८३ साक्षीदारांकडे तपास केले आहे. तर २८६ लोकांकडे मोबाईलद्वारे तपासणी केल्याचे**



**फडणवीस म्हणाले. याप्रकरणी कुणालाही पाठिशी घालणार नसल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.** पान २ वर

### ज्ञानेश्वरी मुंडे पुन्हा आक्रमक

मृत महादेव मुंडे यांच्या पत्नीने विषारी द्रव प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केला होता.या प्रकरणी त्याच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर त्या म्हणाल्या , गुन्हे दाखल कशाला करता माझे एन्काऊटर करा असे त्यांनी पोलिसांना आवाहन केले. दरम्यान त्या पुन्हा आक्रमक झाल्या असून माझी मुलं बाबांना का मारले अशी विचारणा करत असून महिनाभरात न्याय न मिळाल्यास जीवन संपवणार असल्याचा इशारा ज्ञानेश्वरी मुंडे यांनी दिला आहे.

# यापुढे शिक्षक, कर्मचाऱ्यांना द्यावे लागणार चारित्र्य प्रमाणपत्र

**बीड । प्रतिनिधी**

**शहरातील उमाकिरण संकुल आणि ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूल या ठिकाणी विद्यार्थिनींचा लैंगिक छळ झाल्याचे प्रकरण ताजे असताना आज गुणवत्ता विकास आढावा बैठक घेण्यात आली या बैठकीमध्ये जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी आता शिक्षक विद्यार्थी समन्वय यासंदर्भात शिक्षकांना चारित्र्य प्रमाणपत्र बंधनकारक केले आहे.**



गुरु आणि शिष्याच्या नात्याला काळीमा फासणाऱ्या काही घटना घडल्या आहेत या घटनेची दखल आता शिक्षण विभागाने घेतले असून बीड जिल्ह्यातील खाजगी आणि शासकीय शाळेमधील शिक्षकांना चारित्र्य प्रमाणपत्र देणे आता बंधनकारक होणार आहे विशेषता आज जिल्हा परिषद शिक्षण विभागाचा गुणवत्ता विकास आढावा ही बैठक घेण्यात आली शाळेमधील विद्यार्थ्यांची गळती थांबवण्यासाठी विविध उपाययोजना कराव्यात असे शासनाचे निर्देश आहेत त्यानुसार सर्व शालेय समिती शिक्षक आणि गावकऱ्यांच्या मदतीने हा उपक्रम राबविण्याचा सूचना त्यांनी त्यांनी केला यावेळी बोलताना सीईओ रहमान म्हणाले की २६ अर्थसंहिता शाळातील शिक्षक व कर्मचारी यांचे चरित्र प्रमाणपत्र संबंधित पोलीस विभागामार्फत करून घ्यावे पान २ वर

# विधिमंडळात सदस्य, मंत्री, पीए यांनाच प्रवेश

## आव्हाड–पडळकर राड्यानंतर विधानसभा अध्यक्ष नार्वेकरांचा निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

अधिवेशन काळात सामान्य नागरिकांना विधिमंडळात प्रवेश बंदी घालण्यात आली आहे. विधिमंडळात सदस्य, मंत्री, अधिकृत पीए यांनाच प्रवेश दिला जाणार असल्याची घोषणा विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी केली आहे. सर्वसामान्य नागरिकांना प्रवेश देण्याचा अधिकार सभापती आणि सचिवांना असणार असून आव्हाड-पडळकर समर्थकांमधील राड्यानंतर हा निर्णय घेण्यात आला. पान २ वर

### विधिमंडळाऐवजी मंत्रालयात बैठका होणार

विधिमंडळात बैठका घेण्याऐवजी मंत्रालयात बैठका आयोजित करण्याच्या सूचना विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी दिल्या. ते पुढे म्हणाले, अपवादात्मक परिस्थितीत विधान भवनात बैठक घेतली, तरी अभ्यागतांना प्रवेश दिला जाणार नाही. या निर्णयामुळे विधान भवनातील सुरक्षितता आणि शिस्त राखण्यासाठी कठोर पावले उचलली जाणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.

# राज्यात ३५७ पशुवैद्यकीय दवाखान्याला मिळणार नवी इमारत

## पंकजाताई मुंडे यांच्या कामाचा धडाका; बीड जिल्ह्यात २४ इमारतीसाठी ९ कोटी ४० लाखांची तरतुद

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या नियोजनबद्ध आणि गतिशील काम करण्याच्या पध्दतीमुळे राज्यात ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. जिल्हा वार्षिक योजनेतून इमारत बांधकामासह दवाखान्याची दुरूस्ती, स्वच्छतागृह व उपकरण खरेदी यासाठी ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रूपयांची तरतूद करण्यात आली



आहे.

पर्यावरण व पशुसंवर्धन विभागाची सुत्रे हातात घेतल्यापासून ना. पंकजाताई मुंडे यांनी एका मागोमाग एक चांगल्या निर्णयासह आपल्या कामाचा धडाका सुरू केला आहे. पशुसंवर्धनला कृषी व्यवसायाचा दर्जा देणारे देशातील पहिले राज्य करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती देण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे राज्याच्या सात महसूली विभागातील ३४ जिल्ह्यात एकूण ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. नवीन इमारत पान २ वर

# नगरपालिके समोरच्या रस्त्याची मालकी कोणाकडे?

## प्रशासनाने आगोदर जाहीर करावे–उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील प्रमुख रस्त्या पैकी एक असणारा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, या रस्त्याची चाळन झाली आहे. नगर पालिका, जिल्हापरिषद याचा मार्गांवर असुन या रस्त्यावर शेकडो लहान मोठे खड्डे पडले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी या रस्त्यावरील खड्या संदर्भात



### रस्त्याची झाली चाळण,रस्त्यासाठी नेमकं कोणतं प्रशासन?

नगरपालिके कडे विचारणा केली तर संबंधित रस्ता आमच्या कडे नसून हा रोड सार्वजनिक बांधकाम विभाग कडे असल्याचे सांगितले, बांधकाम विभागाला विचारले असता त्यांनी नगर पालिकेकडे असल्याचे सांगितले. संबंधित रस्त्याचा मालक कोण? हे प्रशासनाने आगोदर जाहीर करावे, असे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी पत्रकात म्हंटले आहे.

सोमवारी या रस्त्याच्या समस्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्याच्या भेटी घेणार असुन. येत्या महिनाभरात हा रस्ता नव्याने तयार व्हावा या साठी पाठपुरावा करणा असल्याचे उल्हास गिराम यांनी सांगितले. पान २ वर

# खरेदी विक्री संघाच्या अध्यक्षपदी सतीश जाधव तर उपाध्यक्षपदी भागवत खाडे

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुका खरेदी.–विक्री संघाच्या १७ संचालक पदाची निवडणुक विनविरोध करण्यात आली. आ.सरेश धस गटाचे ९. रामकृष्ण बांगर गटाचे ५ तर मा. आ. भिमराव धोंडे ३ असे एकुण १७ संचालक निवडले गेले.**

शुक्रवार दि. १८ जुलै २०२५ रोजी .निवडणुक निर्णय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था श्री.आर. एम. मोटे यांच्या अध्यक्षतेखाली .पदाधिकारी निवडी संदर्भात बैठक आयोजीत करण्यात आली होती. यावेळी



सुरेश धस गटाकडुन अध्यक्ष पदासाठी सतीश कल्याणराव जाधव तर सहकार महर्षी रामकृष्ण बांगर गटाकडुन उपाध्यक्षपदासाठी भागवत कारभारी खाडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला होता. अध्यक्ष व उपाध्यक्ष पान २ वर

### बीड शहरात तरुणाची आत्महत्या

**बीड । प्रतिनिधी**

शहरातील पालवन चौक भागातील तरुणाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना आज सकाळी उघडकीस आली. पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेह पान २ वर



## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ जुलै २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|
| गहू:९.५० क्विंटल | | |
| २,४६६ | २,७५३ | २,६४६ |
| ज्वारी/हायब्रिड : ३३.०० क्विंटल | | |
| २,००१ | २,७९१ | २,३७१ |
| मका/लोकल:१०.५०क्विंटल | | |
| २,१५१ | २,१५१ | २,१५१ |
| तूर :२५.०० क्विंटल | | |
| ५,६०० | ५,६०० | ५,६०० |
| उडीद : १.५० क्विंटल | | |
| ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: २८.५० क्विंटल | | |
| २,१०० | २,८२४ | २,५७५ |
| मुग: ०.५० क्विंटल | | |
| ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | | |
| ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: २.०० क्विंटल | | |
| ५,७०० | ६,१५० | ५,९२५ |

# शेतकऱ्यांना वेठीस धरु नका, त्यांची कामे लवकर करा–अपर जिल्हाधिकारी धार्मिक

**बीड । प्रतिनिधी**

**शासन आपल्या दारी या उपक्रमामध्ये आज म्हाळस जवळा या ठिकाणी शेतकरी आणि तेथील केंद्राची संवाद शेतकऱ्यांना वेठीस धरू नये त्यांची कामे तातडीने पूर्ण करा असे निर्देश महसूल मंडळाला दिलेशुक्रवार १८ जुलै रोजी अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी म्हाळसजवळा मंडळ व ग्राम महसूल अधिकारी म्हाळसजवळा सजाची दप्तर तपासणी केली.**


धार्मिक यांना मंडळ अधिकारी स्तरावर , ग्राम महसूल अधिकारी स्तरावर म्हणजेच तलाठी स्तरावर कशाप्रकारे कामकाज चालते याची चाचपणी करायची होती . शिवाय शासन निर्देशानुसार मंडळ अधिकारी आणि त्यांच्या अधिनस्त ग्राम महसूल अधिकारी



यांचे अभिलेखे म्हणजेच रेकॉर्ड व्यवस्थित ठेवण्यात आलेले आहे काय याची त्यांनी यावेळी पाहणी केली .या वेळी त्यांनी एका आपले सरकार केंद्राला भेट देऊन विविध प्रमाणपत्र कशा प्रकारे दिले जातात , प्रमाणपत्र देताना विलंब होतो किंवा कसे , काही अडचणी आहेत काय याबाबत सविस्तर माहिती घेतली . बेकायदेशीर कामे कराल तर कारवाई होईल याबाबतही त्यांनी तंबी दिली सोबतच त्यांना भेटण्यास आलेल्या नागरिकांच्या अडचणींचे तात्काळ निराकरण केले . श्री अविनाश खांडे यांच्या रस्त्याचा प्रश्न अनेक दिवसापासून प्रलंबित आहे . त्याबाबत धार्मिक यांनी तात्काळ तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना फोनद्वारे हा प्रश्न तात्काळ निकाली काढण्याबाबत सूचना दिल्या. उपस्थित नागरिकांशी चर्चा करताना त्यांनी नमूद केले की जिल्ह्याचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या पान २ वर

# सगळे आमदार माजले!

## मुख्यमंत्री संतापले; सर्वच आमदारांना खडेबोल सुनावले



**मुंबई । प्रतिनिधी**

**विधानसभेत झालेल्या घटनांमुळे महाराष्ट्राचे राजकारण चर्चेत आले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी विधानभवनात घडलेल्या काही घटनांवर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सगळे आमदार माजले असल्याचे बाहेरचे लोक म्हणतात, त्यामुळे सगळ्याच आमदारांनी संयम ठेवावा, असे ते म्हणाले.**

आ. जितेंद्र आव्हाड आणि आ. गोपीचंद पडळकर यांच्या समर्थकांमध्ये विधानभवनात मोठा राडा झाला. याचे पडसाद संपुर्ण राज्यात उमटले असून अधिवेशनातही पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# दोन्ही बाजुंच्या समर्थकांमध्ये संभ्रम कायम!

शिवसेना (उबाठा) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा ५ जुलै रोजी मुंबईत झालेला मेळावा केवळ मराठीच्या मुद्यावर होता, तो राजकीय मेळावा नव्हता, असे वक्तव्य मनसेचे नेते राज ठाकरे यांनी केल्याचे वृत्त काही माध्यमांनी दिले. त्याचे राज ठाकरे यांनी जोरदार खंडन केले आहे. उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेशी युतीबाबत आपण कोणतेही वक्तव्य केलेले नाही, माध्यमांच्या एका गटाने आपल्या तोंडून न आलेली वाक्ये टाकली आहेत, असा दावा राज यांनी बुधवारी केल्याने दोन्ही पक्षांमधील युतीची शक्यता दुरावू लागली आहे. 'एक्स'या सोशल मीडियावरील 'पोस्ट'मध्ये राज ठाकरे म्हणाले, जर मला कोणतेही राजकीय विधान करायचे असेल, तर मी पत्रकार परिषद घेऊन ते स्पष्टपणे मांडेन. ते पुढे म्हणाले, १४ आणि १५ जुलै रोजी नाशिकमधील इगतपुरी येथे मनसेच्या निवडणूक पदाधिकाऱ्यांसाठी एक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी पत्रकारांशी अनौपचारिक चर्चा झाली. मी जे उच्चारलेच नाही ते माझ्या नावाने छापण्यात आले. मी म्हणालो की, महापालिका निवडणुकीपूर्वी परिस्थिती पाहून युतीचा निर्णय घेण्यात येईल. अशा अनौपचारिक चर्चांना अनौपचारिकच ठेवावे.

राज आणि उद्धव ठाकरे दोन दशकांनंतर एकाच व्यासपीठावर आले होते. त्या दिवशी उद्धव ठाकरे यांनी मुंबईसह इतर महापालिकांमध्ये आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर युतीबाबत उत्सुकता दर्शविली होती, तर राज ठाकरे यांनी अद्याप आपली भूमिका स्पष्ट केलेली नाही. मुंबई मनपाची निवडणूक, जी शिवसेनेची ताकद मानली जाते. तसेच अन्य मनपाच्या निवडणुका वर्षअखेर होण्याची शक्यता आहे. राज ठाकरे यांनी शिवसेना सोडली आणि मनसे पक्ष स्थापन केला. त्यांनी आपल्या पक्षाला 'मराठी माणसांचा खरा आवाज' म्हणून सादर केले. ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या चर्चा रंगत असल्या तरी या बंधूंच्या नेतृत्वाखालील पक्षांनी अनेक निवडणुकांमध्ये एकमेकांविरुद्ध लढत दिली आहे.

शिवसेना उबाठा आणि मनसेच्या युतीसंदर्भात मनपा निवडणुका जाहीर झाल्यानंतर राज ठाकरे विचार करणार असल्याचे वृत्त काही प्रसार माध्यमांनी प्रसिद्ध केले होते. मात्र, अनौपचारिक गप्पांमध्ये मी असे काही बोललो नाही. मला राजकीय विधान करायचे असेल तर मी अधिकृत पत्रकार परिषद घेईन असे म्हणत राज ठाकरे यांनी प्रसार माध्यमातील पत्रकारांना खडे बोल सुनावले.

मनसेने निवडक पदाधिकाऱ्यांसाठी इगतपुरी येथे शिबिर आयोजित केले होते. त्या दरम्यान पत्रकारांशी राज यांचा अनौपचारिक संवाद झाला. त्यासंबंधी राज म्हणाले, मला ५ जुलैच्या विजयी मेळाव्याबाबत विचारण्यात आले तेव्हा तो मेळावा राजकीय नव्हता तर तो मराठी माणसाच्या विजयाचा मेळावा होता असे उत्तर दिले. युतीबाबत विचारणा झाली तेव्हा युतीच्या चर्चा तुमच्यासोबत करायच्या का असा सवाल केला. त्यावरून काही इंग्रजी आणि मराठी वर्तमानपत्रांनी मी न बोललेले शब्द माझ्या तोंडी घातले. ही कुठली नवीन पत्रकारिता जन्माला आली आहे असा प्रश्न राज यांनी केला. अनौपचारिक गप्पा या अनौपचारिकच ठेवायच्या असतात. त्यातले काही प्रसिद्ध केलेच तर जे बोलले नाही ते समोरच्याच्या तोंडात घालायचे नसते, हे भान पण आता गेले आहे का? कोणाच्यातरी आहारी जाऊन किंवा सांगण्यावरून पत्रकारिता करायची हा एक नवीन पायंडा काही मोजक्या पत्रकारांनी पाडला आहे. हे आमच्या लक्षात येत नाही असे समजू नका असेही राज म्हणाले. १९८४ पासून आमचा पत्रकारितेशी संबंध आहे. आमच्या घरातच साप्ताहिके, वर्तमानपत्रे सुरू होती. त्यामुळे पत्रकारितेचे खूप जवळून निरीक्षण केले आहे. असा समाचार राज ठाकरे यांनी चुकिच्या बातम्या देणाऱ्या पत्रकारांचा घेतला. महाराष्ट्राच्या हितासाठी आम्ही एकत्र आलो आहोत अशी घोषणा राज ठाकरे यांनी ५ जुलै रोजी केली होती, तर उद्धव ठाकरे यांनी आम्ही एकत्र राहण्यासाठीच एकत्र आलो आहोत असे म्हटले होते. त्यावर मुंबई महापालिका निवडणूक डोळ्यासमोर ठेवून उद्धव आणि राज ठाकरे यांचे राजकारण सुरू असल्याची टीका झाली होती. आमचा 'म' हा महापालिकेचा नाही तर महाराष्ट्राचा आहे असे सांगून उद्धव ठाकरे यांनी आगामी राजकारणात आपली राज ठाकरे यांच्यासोबत व्यापक युती होऊ शकते याचे संकेत दिले होते. महाराष्ट्राच्या मनात जे आहे ते निश्चितच होईल, असे विधान उद्धव ठाकरे करत होते. उद्धव ठाकरे यांनी सकारात्मक पावले उचलल्यामुळे राज ठाकरे यांनीसुद्धा त्यांना प्रतिसाद दिला. परंतु युतीबाबत पुढे फारशी प्रगती झालेली नाही. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या समर्थकांमध्ये संभ्रम आहे, त्यांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह आहे. उद्धव आणि राज यांच्या युतीबाबत मराठी माणसात औत्सुक्याचे वातावरण आहे. एखाद्या राजकीय घटनेबाबत इतके कुतुहल महाराष्ट्राने गेल्या काही वर्षांत अनुभवले नसेल. दोन्ही बंधूंनी एकत्र येऊन समजूतदार राजकारण करावे, अशी साऱ्यांचीच अपेक्षा असेल.

# संत गजानन महाराजांच्या पालखीचे गेवराईत उत्साहात स्वागत

## जय गजानन.श्री गजानन.. जयघोषाने दुमदुमूला परिसर; दिंडीत सहभागी वारकऱ्यांनी घडविले शिस्तीचे दर्शन

गेवराई । प्रतिनिधी

**आषाढी एकादशी निमित्ताने आषाढी वारीसाठी पंढरपूरच्या विठुरायाचे दर्शन घेवून शेगांवकडे परतीचा प्रवास करणाऱ्या श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे शुक्रवारी सायंकाळी गेवराई शहरात आगमन झाले. ठिकठिकाणी रांगोळी तसेच फुलांचा वर्षाव करत दिंडीचे मोठ्या भक्तीमय वातावरणात जल्लोषात उत्साहात स्वागत करुन जय गजानन श्री गजानन या जयघोषात गेवराई शहर दुमदुमून गेले होते. मिरवणूक मार्गावर पालखीचे ठिकठिकाणी राजकीय मंडळी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी तसेच भक्तगण मंडळींच्या वतीने स्वागत करुन भक्तांनी भक्तीभावाने दर्शन घेतले. दरम्यान दिंडीत सहभागी असलेल्या वारकऱ्यांनी शिस्तीचे दर्शन घडविले. यावेळी गेवराई पोलिसांकडून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.**



विदर्भाची पंढरी असलेल्या शेगांवच्या संत गजानन महाराजांची पालखी टाळ मृदंगाचा गजर करत शुक्रवार दि.१८ जुलै रोजी गेवराई शहरात आगमन झाले. भाविकांनी रांगोळी काढुन, फुलांची उधळण करत फटाके वाजवुन जल्लोषात स्वागत केले.पालखी शहरातील नवीन मार्केट कमिटी, मोंढा नाका, पंचायत समिती रोड, जुने बसस्थानक मार्गे शहरातील जिल्हा परिषद कन्या शाळेत विश्रांतीसाठी शुक्रवारी पालखीचा मुक्काम झाला. दरम्यान श्रींच्या पंढरपूर पालखी पायी वारीचे यंदा ५६ वे वर्ष आहे. श्री संत गजानन महाराज संस्थानने अखंडितपणे पायी वारीची परंपरा कायम ठेवली असून शेगांव येथील मंदिरातून दि.०२ जुन २०२५ रोजी प्रस्थान झालेल्या दिंडीचा प्रवास ७५० कि.मी. चालत वाटेत लागणाऱ्या नऊ जिल्ह्यातून प्रवास करत आषाढी एकादशीला पंढरपूरमध्ये दाखल होते. परतीचा प्रवास सुद्धा पायीच असतो. ''श्रीं''च्या पालखी सोहळ्या सोबत भगव्या पताका खांद्यावर घेतलेले श्वेतवस्त्रधारी वारकरी, वाहन, घोडे, बँड पथक आदी वाद्यसह शिस्तबद्ध रांगा अशी तीर्थक्षेत्र पंढरपुर ते गेवराई पायी चालत प्रवास करीत शुक्रवारी पालखी शहरात आली, यावेळी पालखीचे ठिकठिकाणी जल्लोषात स्वागत करण्यात आले. शहरात प्रवेश होताच भक्तिमय वातावरणात हा परिसर हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेला होता. शहरात ठिकठिकाणी वारकऱ्यांचे स्वागत करुन भाविकांनी भक्तिभावाने दर्शन घेतले. दरम्यान यावेळी गेवराई पोलिसांकडून चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.तर पालखी शहरातील विविध मार्गावरून जिल्हा परिषद कन्या प्रशालेत विश्रांतीसाठी मुक्कामी होती यावेळी ''श्रीं''ची नित्यनेमा प्रमाणे आरती होवून भाविकांनी रांगेत दर्शन घेवून विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले तर पालखी रात्री मुक्कामी थांबून शनिवारी सकाळी शहागड मार्गे पुढे शेगांवकडे प्रस्थान करणार आहे.

# प्राचार्य संघटनेच्या कोषाध्यक्षपदी डॉ.भारत खंदारे यांची नियुक्ती

परतूर । प्रतिनिधी

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रात कार्यरत असणाऱ्या अशासकीय महाविद्यालयीन प्राचार्य संघटनेच्या कोषाध्यक्षपदी येथील डॉ.भारत खंदारे लालबहादूर शास्त्री महाविद्यालयाचे प्राचार्य तथा विद्यापीठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ.भारत खंदारे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पाचोड येथील शिवाजी महाविद्यालयात रविवारी पार पडलेल्या संघटनेच्या बैठकीत कार्यकारिणीचे पुनर्गठन करण्यात आल्यानंतर नूतन पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील महाविद्यालये,प्राचार्य,प्राध्यापक आणि विद्यार्थी यांचे प्रश्न घेऊन विद्यापीठाशी समन्वय साधत ते सोडवण्याची संघटना कार्यरत आहे. कुलगुरू डॉ.विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयीन शैक्षणिक विकासासाठी नियोजनबध्द कार्यवाही करण्यासह इतर महत्वाचे निर्णय या बैठकीत घेण्यात आले.**



विद्यापीठ स्तरावर कार्यरत महत्त्वाच्या संघटनेत कोषाध्यक्ष पदावर नियुक्ती झाल्याबद्दल डॉ.भारत खंदारे यांचे मराठवाडा सर्वोदय शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव कपिल आकात, उपाध्यक्ष कुणाल आकात यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# निवडणूक जाहीर झाल्यावर राज ठाकरेंसोबत चर्चा करु

## उद्धव ठाकरेंचे सूचक वक्तव्य, सरकारवही टीका

मुंबई । प्रतिनिधी

**अनेक वर्षांनंतर आम्ही दोघे व्यासपीठावर एकत्र आलो ते एकत्र राहण्यासाठी असं सूचक वक्तव्य शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी केलं. आज कोणतीही निवडणूक जाहीर झालेली नाही, झाली तर चर्चा करु शकतो, असे म्हणत उद्धव ठाकरेंनी राज ठाकरेंच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. उद्धव ठाकरेंनी पत्रकार परिषद घेतली.**



**यावेळी त्यांनी सरकारवरही हल्लाबोल केला.**

यावेळी पुढे बोलताना उध्दव ठाकरे म्हणाले, मी स्वत: पिककर्ज मुक्तीची घोषणा केली होती. आम्ही सुरु केले तेव्हा सरकार पाडले गेले आहे. मी अनुभव नसताना पहिल्या अधिवेशनात केले, तुम्ही मंत्री आहात, खाती असतात, अभ्यास कसला करत आहात कर्जमुक्तीसाठी असा सवाल उद्धव ठाकरेंनी केला. माझा चेहर हसराच असतो, मी रेडा कुठे कापला नाही असे उद्धव ठाकरे म्हणाले. आज अधिवेशन संपत आहे. ३ आठवड्याचे अधिवेशन होते. जनतेच्या समस्या संदर्भात प्रश्न होते. मुख्यमंत्र्याचे भाषण कसे होते, आईला मुलगा म्हणतो आईस्क्रिम हवे आहे. आता काही होत नाही भविष्यात हे होईल असे म्हणत ठाकरेंनी मुख्यमंत्र्यांना टोला लगावला. पुरवण्या मागण्यावर जास्त भर दिला. राज्यावर कर्जाचा डोंगर वाढत चालला आहे. हे कर्ज फेडणार कसे? कर्ज कमी कसे करणार? योजनाचं काय लाडका भाऊ बहिण याची उत्तर नाहीत असे ठाकरे म्हणाले.

# वाढदिवसाचा केक तलवारीने कापणे भोवले; दिंद्रुड पोलिसांनी चौघांना केले गजाआड

दिंद्रुड । प्रतनिधी

**माजलगाव तालुक्यातील उमरी या गावांमध्ये एका तरुणाच्या वाढदिवसानिमित्त तलवारीने केक कापणे चौघांच्या चांगलेच अंगलट आले आहे. दिंद्रुड पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे यांनी याप्रकरणी गुन्हा दाखल करून चौघांना गजाआड केले आहे.**

दिनांक १५ जुलै रोजी पोलीस ठाणे दिंद्रुड हद्दीत मौजे उमरी, (ता. माजलगाव) येथील अनिल जनार्धन शिंदे याचा वाढदिवस होता. सदर वाढदिवसानिमित्त उमरी गावात मित्रमंडळीसह रात्रीच्या वेळी डीजेवर नाचण्यासह तलवारीने केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. सदर वाढदिवस कार्यक्रमास अनिल शिंदे याचे काही मित्र उपस्थित होते. आपले गावातील व परीसरातील वजन दाखविण्यासाठी वाढदिवसाचा केक तलवारीने कापण्यात आला. सदर कार्यक्रमाचे फोटो काढण्यात आले. तसेच सदरचे फोटो सुनिल जनार्धन शिंदे या त्याच्या भावाने फेसबुक सोशल मिडीयाव्दारे शेअर केले. सदरचे फोटो पोलीस



ठाणे दिंद्रुड येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे यांना मिळाल्यानंतर त्यांनी सदर फोटोबावत माहिती मिळविली असता सदरचा वाढदिवस कार्यक्रम हा पोलीस ठाणे दिंद्रुड हद्दीत मौजे उमरी, ता. माजलगाव येथे दिनांक १५/०७/२०२५ रोजी रात्री २०.३० वा. च्या सुमारास पार पडला असल्याचे समजले. तसेच सदर फोटोमध्ये तीन तलवारीव्दारे केक कापणाऱ्या चार व्यक्ती नामे अनिल जनार्धन शिंदे, (वय ३४ वर्षे), महादेव प्रताप शिंदे, ( वय २२ वर्षे, दोन्ही रा. उमरी, ता. माजलगाव), विशाल गवळी, (रा. पिंपळगाव (नाखला), ता. माजलगाव), दादा म्हस्के, (रा. पात्रुड, ता. माजलगाव( असल्याचे निष्पन्न झाले. तसेच तलवारीने केक कापल्याबाबतचे सदर वाढदिवसाचे फोटो दहशत निर्माण करण्याच्या उद्देशाने अनिल शिंदेचा भाऊ सुनिल जनार्धन शिंदे, रा. उमरी, ता. माजलगाव याने त्याच्या फेसबुक या सोशल मिडीयावर शेअर केले. म्हणून वरील पाचही जनांवर शस्त्र अधिनियम १९८८ अन्वये पो.स्टे. दिंद्रुड येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्हा करण्यासाठी वापरलेल्या एकुण ०३ तलवारी गुन्हयाच्या तपासकामी दिंद्रुड पोलीसांनी जप्त केल्या आहेत. सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनित काँवत, अंबाजोगाई अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरु यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे दिंद्रुड येथील सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव ढाकणे, पोउपनि संजयकुमार राठोड, सफौ नंदकुमार वाघमारे, पोह/युवराज श्रीडोळे, पोशि/कैलास पोटे यांनी केली.

## पान १ वरून...

### मोदींचे पैसे कधी येणार? २० व्या

किसानच्या १९ व्या हप्त्याचे २००० रुपये शेतकऱ्यांना २४ फेब्रुवारी २०२५ रोजी देण्यात आले होते. ही रक्कम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत बिहार मधील एका कार्यक्रमातून वितरित करण्यात आली होती. त्यापूर्वीच्या १८ व्या हप्त्याची रक्कम महाराष्ट्रातील वाशिम जिल्ह्यात कार्यक्रम आयोजित करुन देण्यात आली होती. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या १९ व्या हप्त्याची रक्कम २४ फेब्रुवारी रोजी करण्यात आले होते. त्याला आता चार महिने पूर्ण झाले आहेत. आता शेतकऱ्यांना २० व्या हप्त्याचे २००० रुपये कधी मिळणार याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. पीएम किसान सन्मान निधी योजना केंद्र सरकारने फेब्रुवारी २०१९ मध्ये सुरु करण्यात आली होती. शेतकऱ्यांना आर्थिक मदत म्हणून पीएम किसान सन्मान निधी योजना सुरु करण्यात आली होती. या योजनेतून शेतकऱ्यांना आर्थिक मदत केली जाते. आता खरिप हंगामाच्या निमित्ताने २० व्या हप्त्याची रक्कम कधी मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. पीएम किसान सन्मा निधीच्या २० व्या हप्त्याची रक्कम मिळावी म्हणून योजनेतील पात्र शेतकऱ्यांना देखील काही गोष्टींची पूर्तता करावी लागेल. त्या गोष्टींची पूर्तता केल्यास शेतकऱ्यांना पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या हप्त्याची रक्कम मिळण्यात कोणतीही अडचण येणार नाही.

--------

### विधिमंडळात सदस्य, मंत्री,

विधान भवनाच्या लॉबीत भाजप आमदार गोपीचंद पडळकर आणि राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे आमदार जितेंद्र आव्हाड यांच्या समर्थकांमध्ये जोरदार हाणामारी झाली. या वादाने शिवीगाळ आणि मारहाणीपर्यंत मजल मारली. विधान भवनासारख्या पवित्र ठिकाणी हा प्रकार घडल्याने विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी याची गंभीर दखल घेत आमदारांना कडक ताकीद दिली आणि एक महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर केला. नार्वेकर यांनी घोषणा केली की, यापुढे विधान भवनात अभ्यागतांना प्रवेशास मनाई असेल. ते म्हणाले, गेल्या काही दिवसांतील आमदारांचे वर्तन चिंताजनक आहे. आमदारकीची शपथ घेताना संविधानाचे पालन करण्याचे वचन दिले जाते, त्याचे गांभीर्य राखले जावे. त्यामुळे आता फक्त आमदार आणि त्यांच्या अधिकृत स्वीय सहाय्यकांनाच विधान भवनात प्रवेश मिळेल.

---------

### महादेव मुंडे हत्याप्रकरण

परळीतील महादेव मुंडे खून प्रकरण गेल्या काही दिवसापासून चर्चेत असून आ. सुरेश धस यांनी यात लक्ष घातल्यानंतर तपासाला गती आली. हे प्रकरण आता थेट विधानसभेत गाजले आहे. यावेळी फडणवीस म्हणाले, खुल्या मैदानात हल्ला झाला, त्यामुळे साक्षीदार सापडला नाही. एक महिला दीड महिन्यांनी पुढे आल्याचे फडणवीस म्हणाले. डम डाटा आपण तपासत आहोत. महादेव मुंडे यांच्या पत्नीचा आक्रोश मी समजू शकतो. याप्रकरणी कुणालाही पाठिशी घालणार नसल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

-----------

### राज्यात ३५७ पशुवैद्यकीय दवाखान्याला

बांधण्याकरिता २८७ कोटी ७६ लाख ४४ हजार तर दुरुस्तीसाठी १२१ कोटी ११ लाख ८२ हजार, स्वच्छतागृह साठी २५ कोटी १७ लाख २० हजार, विविध उपकरणे खरेदीसाठी २४ कोटी ३५ लाख ८८ हजार असा एकूण ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रूपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षांत जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ही सर्व कामे प्रस्तावित करण्यात येणार आहेत.

**बीड जिल्हयात २४ इमारतीसाठी ९ कोटी ४० लाख**

बीड जिल्हयात सर्व सहाही मतदारसंघात २४ इमारतीसाठी ९ कोटी ४० लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.राज्यात ज्या ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत, त्यांची विभागनिहाय संख्या पुढील प्रमाणे मुंबई विभाग - ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात १३, पुणे विभाग - पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यात १२५, नाशिक विभाग - नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर जिल्ह्यात ५५, छत्रपती संभाजीनगर विभाग - छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड जिल्हयात ५१, लातूर विभाग- लातूर, नांदेड, धाराशीव, हिंगोली जिल्हयात ३९, अमरावती विभाग- अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ जिल्हयात ३८, नागपूर विभाग- नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यात ३६ अशा एकूण ३२७ ठिकाणी नवीन इमारती साठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

-----------

### यापुढे शिक्षक कर्मचाऱ्यांना

विस्तार अधिकारी गटशिक्षण अधिकारी यांनी वेळोवेळी शाळेंना भेटी देऊन शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी प्रयत्न करावा जेणेकरून शाळेमधील गळती थांबेल दर सोमवारी प्रत्येक शाळेत बालविवाह विरोधी उपक्रम राबविण्यात यावा असे केल्यास बालविवाह थांबण्यास मदत होईल याशिवाय शाळेच्या दर्शनी भागामध्ये १०९८ क्रमांक लिहून जनजागृती करावी शाळेमध्ये तक्रार पेटी देखील ठेवण्यात यावी ही तक्रारपेटी आठवड्यातून एकदा उघडण्यात यावी बीड तालुक्यातील कार्यक्रमात येथील शाळेची प्रशंसा केली या शाळेमध्ये वाचन लेखन गणित आणि विज्ञान तसेच भाषा पेटी नकाशाचा वापर केला जातो बीड जिल्ह्यातील घडलेल्या घटना पाहता आता शिक्षक आणि कर्मचाऱ्यांना पोलिसांकडून चारित्र्य प्रमाणपत्र देणे बंधनकारक होणार आहे

-----------

### बीड शहरात तरुणाची

शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात पाठवला . आकाश हनुमंत गालफाडे (वय २५ वर्ष)रा. पालवन चौक, बीड असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव असून, त्याने आज सकाळी पाण्याच्या टाकीजवळ नर्सरी भागात गळफास घेऊन आत्महत्या केली. हा प्रकार स्थानिक नागरीकांच्या लक्षात येताच त्यांनी घटनेची माहिती पोलिसांना दिली. माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल केला. मात्र या आत्महत्येचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

----------

### खरेदी विक्री संघाच्या अध्यक्षपदी सतीश

पदासाठी या दोघांचे एकमेव अर्ज आल्याने अध्यक्षपदासाठी . सतीश जाधव यांची तर उपाध्यक्ष पदासाठी भागवत कारभारी खाडे विनविराध करण्यात आली.

----------

### नगरपालिके समोरच्या रस्त्याची

बीड शहरातील मुख्य बाजारपेठेत जाणारा हा मार्ग प्रमुख प्रशासकीय कार्यालयाला ही जोडला आहे. शाळा, महाविद्यालये, बाजार मुख्यालयाला हा प्रमुख रस्ता असुन अश्या उडवा उडवीच्या उत्तराने चीड निर्माण होत आहे. सामान्य जनतेच्या भावनांशी हे प्रशासन खेळत आहे. उप मुख्यमंत्री अजितदादा पवार सध्या जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत. त्यांनी या रस्त्याचे गांभीर्य घेऊन नव्याने तयार करावा या साठी त्यांना पत्र पाठवणार असल्याचे उल्हास गिराम यांनी कळवले.

----------

### सगळे आमदार

यावर चर्चा झाली. राजकारणाच्या पलीकडे आपण जाणार आहोत की नाही? असा सवाल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. जितेंद्र आव्हाडांना बोलू द्या, असे जयंत पाटील म्हणाले. यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी सवाल केला. तर मला सर्व गोष्टी दालनात येऊन सांगितल्या गेल्या, असे विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी म्हटले. दरम्यान, सभागृहात बोलत असताना मला धमकी आणि गलिच्छ भाषेत शिवीगाळ करण्यात आल्याचा मुद्दा जितेंद्र आव्हाड यांनी मांडला. यावेळी सभागृहात यावर बोलताना फडणवीस काहिसे भडकल्याचे पाहायला मिळाले. सगळे आमदार माजलेत, असे बाहेर बोलले जात असल्याचे देवेंद्र फडणवीस म्हणाले. त्यामुळे सगळ्याच आमदारांनी थोडासा संयम ठेवावा, असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

----------

### शेतकऱ्यांना वेठीस धरु नका,

अधिपत्याखाली जिल्हाभरात अनेक लोकोपयोगी कार्यक्रम सुरू आहेत . जिल्हाधिकारी स्वतः विविध तालुक्यांना फिरून छत्रपती शिवाजी महाराज समाधान शिबिर योजना , महाराजस्व योजना , जिवंत सातबारा योजना , रस्त्याच्या विविध योजना , अनेक प्रमाणपत्रांचे वाटप यासाठी फिरत आहेत . साक्षाळ पिंपरी येथे जिल्हाधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना बालविवाह करणार नाही तसेच शेतकरी आत्महत्या होऊ देणार नाही अशा आशयाची शपथ दिली होती .अपर जिल्हाधिकारी यांच्या भेटीमुळे ग्रामीण भागातील कर्मचारी यांना आश्चर्याचा धक्का बसला आहे . तसेच वरिष्ठ कधीही आपल्या कामकाजाचा आढावा घेऊ शकतात याची जाणीव झाली . तथापि अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी नमूद केले आहे की केवळ जनतेची कामे वेगाने व्हावी याच उद्देशाने माझ्या भेटी असतात आणि नागरिकांना थेट मला आपले प्रश्न सांगता यावेत यासाठी माझी ही भेट आहे ग्रामीण भागातील या भेटीमुळे नागरिक भारावून गेल्याचे चित्र दिसले . अशाप्रकारे महसूल विभागाचे अधिकारी , कर्मचारी ग्रामीण भागात फिरत राहिले तर कोणाचेही कामे प्रलंबित राहणार नाहीत यात शंका नसावी .

# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....

३

शनिवार दि. १९ जुलै २०२५


## थोडक्यात...

### दिव्यांग व्यक्तीचे विविध प्रश्न तात्काळ मार्गी लावा–विष्णू पाचफुले

जालना । प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील व शहरातील दिव्यांगांच्या मागण्या. संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने सोडवणे व मार्गी लावणे असे



आदेश शिवसेनेचे भावी महापौर विष्णू भाऊ पाचफुले यांनी केले. तसेच दिव्यांगांच्या विविध मागण्या जागा व घरकुल व्यवसाय करण्यासाठी गाळे आणि पाच टक्के निधीमध्ये वाढ करण्यात यावे व ५० टक्के घरपट्टी नळपट्टी माफ करण्यात यावे शासन निर्णयानुसार मार्गी लावणे असे सूचना महानगरपालिका आयुक्त यांना करण्यात आले आहे. शहरातील महानगरपालिका हद्दीतील दिव्यांगांना घरकुल आणि जागा उपलब्ध करा दिव्यांना दोनशे स्केअर फुट जागा उपलब्ध करा दिव्यांगांना मस्तगड भागातील पुनर्वसन केंद्र स्थापन करण्यात यावं दिव्यांग नाळपट्टी आणि घरपट्टी ५०% माफ करण्यात यावं अशा विविध मागण्यांसाठी जालना महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त सुप्रिया चव्हाण यांना निवेदन देण्यात आली आहे येत्या २२ जुलै पर्यंत मागण्या मान्य न झाल्यास महानगर पालिकेतील साईबाबा मंदिरासमोर ठिय्या आंदोलन करण्याचा सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचा इशारा देण्यात आला आहे यावेळी या निवेदनावर सकल दिव्यांग सामाजिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष राहुल मुळे शिवसेना दिव्यांग आघाडी जिल्हाध्यक्ष अनिल मगदूले राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी दिव्यांग सेलचे जिल्हाध्यक्ष सतीश फतपुरे पुजाराम घडे आदिची साक्षरी आहेत

### शिष्यवृत्ती परीक्षेत माईलस्टोनच्या सात विद्यार्थ्यांचे यश, अनुष्का भिसे स्कॉलरशिप साठी पात्र

बीड । प्रतिनिधी

माईलस्टोन इंटरनॅशनल स्कूल, दत्तनगर तळेगाव येथील विद्यार्थ्यांनी स्कॉलरशिप परीक्षेत उत्तम कामगिरी करत शाळेचे नाव उज्वल केले आहे. इयत्ता ५ वीतील १० विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग घेतला होता. त्यापैकी तब्बल सात विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून अनुष्का भिसे शिष्यवृत्ती मिळवण्यासाठी पात्र ठरली आहे.



स्कॉलरशिप परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थीमध्ये अनुष्का भिसे, आयुषी कुलकर्णी, रुद्र मोहिते, आरोही कदम, चैतन्य काकडे, शौर्य मस्के आणि यश बनसोडे. यापैकी अनुष्का भिसे हिने उल्लेखनीय कामगिरी करत शिष्यवृत्ती पात्रता मिळवली आहे. संचालक ज्ञानेश्वर तांबे यांच्या हस्ते अनुष्का भिसे हीचा सत्कार करण्यात आला. यावेळी ज्ञानेश्वर तांबे म्हणाले की, आमच्या शाळेचा उद्देश केवळ पुस्तकी ज्ञान मर्यादित न ठेवता, विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी सज्ज करणे हाच आहे, या यशामागे विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे मार्गदर्शन व पालकांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे ते म्हणाले. अनुष्का भिसे सह इतर विद्यार्थ्यांचे अभिनंदन संचालक नम्रता तांबे, प्रिन्सिपल सारिका जगताप, शिक्षक अमोल क्षीरसागर, सत्यजित ठाकूर शिक्षिका माधुरी तांबे, अर्चना जोगदंड, स्वाती भांडवलकर, सुषमा पवार, अर्चना गोरे, जयश्री राऊत व पालकांनी केले.

### साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंती अध्यक्षपदी विठ्ठल तुपसौंदर

माजलगाव । प्रतिनिधी

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने सोमवार दिनांक १४ जुलै रोजी शहरातील पंचशील नगर व लहुजी नगर येथे समाज बांधवांच्या प्रमुख उपस्थितीत प्राथमिक आढावा बैठक आयोजीत करण्यात आली होती. या बैठकीत



जयंती समितीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून जयंती समितीच्या अध्यक्षपदी सर्वानुमते येथील सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असणारे विठ्ठल तुपसौंदर यांची तर, उपाध्यक्षपदी कच्छिन्द्र कांबळे,सचिवपदी धम्मानंद गावडे,तर कोषाध्यक्षपदी रुद्रा कासार यांची सर्वानुमते निवड करण्यात आली असता यंदाच्या जयंती सोहळ्यात माजलगाव शहरातून भव्य दिव्य मिरवणूक काढण्यात येणार असून विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार असल्याचे कमिटीच्या वतीने कळवण्यात आले आहे. प्रसंगी शिवाजी सुतार,कैलास टाकणखर सचिन जावळे,अतुल अलझेंडे,आनंद साळवे,करणं अलझेंडे,अमर भिसे,आकाश गालफडे,प्रताप तुपसौंदर,भैया भिसे,वैभव जावळे, मारोती साळवे,विशाल अलझेंडे,लखन कांबळे,बाळू साळवे,संजय सुतार,जय सुतार,जित सुतार, केतन भिसे,विक्रम अलझेंडे,केतन मिसाळ,यांच्या सह पंचशील नगर व लहुजी नगरातील जेष्ठ नागरिक तथा युवकांची उपस्थिती होती.

भव्यदिव्य अशा या जयंतीच्या माध्यमातून १०५ फकिरा कादंबरीचे वाटपासह अनेक सामाजिक उपक्रम राबवले जाणार असल्याची माहिती समिती अध्यक्ष विठ्ठल तुपसौंदर यांनी बोलताना दिली

### खा. काळे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याला उपस्थित रहा

जालना : आज दिनांक १९/०७/२०२५ रोजी जालन्या जिल्ह्याचे खासदार डॉ. कल्याणजी काळे यांच्या वाढदिवसानिमित्त महाविकास आघाडी जालना यांच्या तर्फे मातोश्री लॉन्स, अंबड रोड येथे सकाळी १०.०० वाजता अभिष्टचिंतनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे, तरी जालना जिल्ह्यातील महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# देवळा खून प्रकरणी सात जणांवर गुन्हा दाखल

## घरात घुसल्याच्या कारणावरून सलग दोन दिवस केली होती बेदम मारहाण

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**देवळा (ता. अंबाजोगाई) येथे किरकोळ वादातून गावातील काही तरुणांनी मिळून अविनाश गोरोबा सगट (वय २७) यास दोन दिवस जबरदस्तीने उचलून नेत सतत मारहाण केली. या मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या अविनाशचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणी सात जणांविरुद्ध अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**

याप्रकरणी केशरबाई गोरोबा सगट (रा. देवळा, ता. अंबाजोगाई) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांचा मुलगा अविनाश यास दिनांक १५ जुलै २०२५ रोजी सायंकाळी पाच वाजताच्या सुमारास गावातील वैभव नामदेव सगट यांच्या घरी मासे घेण्यासाठी गेला होता. त्या ठिकाणी कोणी नसताना




अविनाश घरात गेला असता विमल निवृत्ती सगट हिने त्याला पाहून आरडा ओरडा केला. त्यामुळे घाबरून अविनाश तिथून पळाला. यानंतर विमल सगट हिने हा प्रकार तिच्या पुतण्यास सांगितला.

प्रशांत निवृत्ती सगट याने अविनाशचा शोध घेतला असता, देवळा ते सारसा जाणाऱ्या रोडवर तो सापडला. त्याठिकाणी प्रशांत सगट याने त्यास मारहाण केली. यावेळी ऋषिकेश खंडू सगट, प्रितम लाला शिंदे, कुलदीप सुभाष सगट, विजय दशरथ पारवे व अमर सुभाष सगट हेही तेथे आले. त्यांनीही हातातील काठ्यांनी पायावर व डोक्यात मारहाण केली. हा वाद सोडवण्यासाठी गेलेल्या महादेव पिराजी बलाढये यालाही त्यांनी लाथाबुक्यांनी मारहाण केली. कुटुंबीयांनी ही बाब गावात समजुतीने मिटवली म्हणून त्यावेळी पोलिसात तक्रार केली नाही.

दुसऱ्या दिवशी पुन्हा मारहाण

दुसऱ्या दिवशी, दिनांक १६ जुलै रोजी वैभव सगट व ऋषिकेश सगट यांनी अन्य दोघांच्या सोबतीने अविनाशला पुन्हा जबरदस्तीने मोटारसायकलवर बसवून अंजनपूर कोपऱ्याच्या दिशेने नेले. त्यांनी अविनाशला धानोरा (खुर्द) गावाजवळील कॅनलवर नेऊन बांबूच्या काठ्यांनी, लाकडी दांडक्याने व लाथाबुक्यांनी बेदम मारहाण केली. त्याचा शरीरभर मार लागून व पोटात गंभीर दुखापत झाली होती. त्यानंतर त्यांनी अविनाशला दुचाकीवर टाकून गावाकडे आणले. यावेळी वैभव सगट याने केशरबाईंना धमकावत सांगितले, "हे काहीच नाही, दोन दिवसांत काय करतो ते बघा."दरम्यान, रात्री प्रकृती खालावल्याने अविनाशला अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचारादरम्यान दिनांक १७ जुलै रोजी पहाटे १.४५ वाजता त्याचा मृत्यू झाला.

### सात जणांविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल

या प्रकरणी अंबाजोगाई ग्रामीण पोलीस ठाण्यात केशरबाई सगट यांच्या फिर्यादीवरून वैभव नामदेव सगट, ऋषिकेश खंडू सगट, प्रितम लाला शिंदे, कुलदीप सुभाष सगट, प्रशांत निवृत्ती सगट, विजय दशरथ पारवे आणि अमर सुभाष सगट (सर्व रा. देवळा, ता. अंबाजोगाई) यांच्याविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला. अंबाजोगाई ग्रामीण पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## सात दिवस सात उपक्रम अभियानात अंबाजोगाई बसस्थानक व परिसराची साफसफाई

अंबाजोगाई । प्रतिनिधी

सात दिवस सात उपक्रम हे अभियान राज्याचे उपमुख्यमंत्री ना अजितदादा पवार तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने सेवा सप्ताह राबवले जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी तसेच बीड जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण यांच्या पुढाकारातून हा सेवा सप्ताह उपक्रम राबविण्यात येत आहे. दि १५ जुलै ते २२ जुलै दरम्यान या सप्ताहात प्रारंभी रक्तदान शिबिर आयोजित करून त्यामध्ये ६३रक्तदात्यांनी मोठ्या उत्साहाने रक्तदान केले. त्यानंतर दुसऱ्या दिवशी वृक्षारोपण आयोजित करून त्यात विविध झाडांचे वृक्षारोपण मोदी लर्निंग सेंटरच्या प्रांगणात करण्यात आले तर तिसऱ्या दिवशी दिव्यांग, मतिमंद शालेय विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. तर दि १८ गुरुवारी चौथ्या दिवशी सकाळी स्वच्छता मोहीम




राबविताना अंबाजोगाई बस स्थानक व परिसराची साफसफाई राजकिशोर मोदी व त्याच्या सहकाऱ्यांच्या वतीने करण्यात आली. यावेळी संपुर्ण बस स्थानक झाडून स्वछ धुवून घेण्यात आले. यामुळे बस स्थानकाचा संपूर्ण परिसर एकदम स्वच्छ व सुंदर दिसत होता.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या पुढाकाराने १५ ते २२ जुलै दरम्यान सात दिवस सात उपक्रम या संकल्पनेवर आधारित अंबाजोगाई शहरात सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात आरोग्य, पर्यावरण,स्वच्छता, शिक्षण तथा सामाजिक जनजागृती यावर विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. यापुढेही संपूर्ण सप्ताहभर अशाच विधायक उपक्रमांची नागरिकांना मेजवानी असणार आहे.स्वच्छता अभियान अंतर्गत अंबाजोगाई बस स्थानक परिसर साफसफाई करतांना मनोज लखेरा,बबन लोमटे, मानसोपचार तज्ज्ञ डॉ राजेश इंगोले,महादेव आदमाने, अमोल लोमटे, यांच्यासह अनेक सहकारी उपस्थित होते.

### अंबाजोगाई तालुक्यात पाऊस कमी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यात यंदा पावसाळ्यात समाधानकारक पावसाची नोंद झालेली नाही. जुलै महिना अर्धा उलटूनही पावसाचे प्रमाण अपेक्षेपेक्षा कमीच राहिल्याने शेतकर्यांसह सामान्य नागरिकही चिंतेत आहेत.गेल्या काही दिवसांत ढगाळ वातावरण असूनही पाऊस झाला नाही. परिणामी, मुख्य नद्या आणि ओढे कोरडे असून विहिरींच्या पाण्याची पातळी झपाट्याने घसरत आहे. पिण्याच्या पाण्यासह शेती सिंचनासाठीही पाणीटंचाई जाणवू लागली आहे.सामान्य सरासरी पर्जन्यमानापैकी फक्त ४०-५० टक्के पाऊस आत्तापर्यंत झालेला नाही. काही ठिकाणी अजूनही पेरणी योग्य पावसाची प्रतीक्षा शेतकरी करत आहेत. जलस्त्रोत कोरडे, जलसाठ्यात दिवसेंदिवस पाण्याची कमतरता भासत आहे. पेरण्या करून बसलेल्या शेतकर्यांच्या पिकांना म्हणावे तसे पावसाचे पाणी मिळत नसल्याने पिके म्हणावे तसे जोमात नाहीत. तलाव, विहिरी व बोरवेलला पाणी कमी असल्याने शेतकर्यांची सिंचन व्यवस्था कोलमडली आहे.

## वृत्तपत्रांच्या शासकीय जाहिरातीची थकित देयके मिळण्यासाठी संपादकांचा आंदोलनाचा इशारा

बीड प्रतिनिधी

शासनाने बीड जिल्ह्यातिल वृत्तपत्राना दिलेल्या जाहिरातीची करोडो रुपयाची देयके कित्येक वर्षांपासुन शासनाकडे मागील काही वर्षातील आणि चालु कालावधीतिलहि रोजगार हमी योजना भू- संपादन जाहिरातीची वृत्तपत्रांची देयके केवळ यंत्रणेच्या निश्काळजीपणामुळे प्रलंबित राहीली आहेत. अनेकदा मागणी करूनही सदरील बिले अदा करण्यात आली नाहीत . ही थकबाकी एक कोटी रुपयांपर्यंत असून दि. १ ऑगस्ट २०२५ पर्यंत जाहिरात बिले अदा करण्याबाबत कारवाई न झाल्यास येत्या स्वांतत्र्य दिनी राज्याचे अर्थमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या समोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा बीड जिल्हा क वर्ग वृत्तपत्र संपादक संघाने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील विविध भु-संपादन कार्यालयामार्फत जिल्ह्यातील वृत्तपत्रांना शासकीय प्रकल्प लागण्यासाठी जमिनी संपादित करण्यासाठी जाहिराती देण्यात येतात. ही परंपरा वर्षानुवर्षे चालू आहे. सदर जाहिरातीची देयके शासकीय यंत्रणेमार्फत दिली जात असतात, जाहिराती प्रसिद्धीस देताना जाहिरात बिल अदा करण्यासाठी निधी उपलब्ध असल्याचे लेखी पत्र हे संबंधित भूसंपादन कार्यालयाकडून माहिती कार्यालयाला दिले जाते मात्र वर्षानुवर्ष जाहिरात प्रसिद्धीचे बील संबंधित कार्यालयाकडून दिले जात नाही. तसेच मागील काही वर्षातील अनेक रोजगार हमी योजना भू-संपादन जाहिरातींची देयके केवळ संबधित कार्यालयातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांच्या दप्तर दिरंगाई आणि निष्काळजीपणामुळे प्रलंबित राहिली आहेत. तसेच नगर पालिका, बांधकाम विभाग, पाणी पुरवठा, जिल्हा परिषद आदी विविध कार्यालयात वृत्तपत्रांची देयके प्रलंबित आहेत. ती अदा करण्यात यावीत. या संदर्भात प्रशासनाकडे आणि शासनाकडेही वारंवार विनंती अर्ज, निवेदन आणि प्रत्यक्ष भेट घेतलेली आहे. सदर विषय जिल्हाधिकारी यांनी प्राधान्याने हाताळून यातून मार्ग काढावा व जिल्ह्यातील वृत्तपत्रांची शासनाकडे असलेली थकीत रक्कम देण्याची कारवाई करावी अशी मागणी क वर्ग वृत्तपत्र संपादक संघाच्या वतीने लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दि. १ ऑगस्ट २०२५ पर्यंत जाहिरात बिले अदा करण्याबाबत कारवाई न झाल्यास येत्या स्वांतत्र्य दिनी राज्याचे अर्थमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या समोर लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा बीड जिल्हा क वर्ग वृत्तपत्र संपादक संघाने जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनाद्वारे दिला आहे.

या निवेदनावर क वर्ग वृत्तपत्र संपादक संघाचे अध्यक्ष राजेंद्र होळकर, कार्याध्यक्ष अभिमन्यू घरत, सरचिटणीस विलास डोळसे, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंखे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### निधी उपलब्ध असल्याचे लेखी पत्र देऊनही जाहिरात बिले थकीत

सदर जाहिरातीची देयके विविध शासकीय यंत्रणेमार्फत दिली जात असतात, जाहिराती प्रसिद्धीस देताना सदरील जाहिरात बिल अदा करण्यासाठी निधी उपलब्ध असल्याचे लेखी पत्र हे संबंधित भूसंपादन कार्यालयाकडून माहिती कार्यालयाला दिले जाते. दोन महिन्यात बिल अदा करण्याबाबत नियमाची तरतूदही असतानाही वर्षानुवर्ष जाहिरात प्रसिद्धीचे बील संबंधित कार्यालयाकडून दिले जात नाहीत. त्यामुळे वृत्तपत्रांची थकबाकी वाढत चाललेली आहे.

## पान ६ वरून...

### निवडणुकीसाठी शिवसेनेची

गेवराई येथील शिवसेना कार्यालयात सकाळी ११:०० वाजता तर आष्टी विधानसभा बैठक पाटोदा रेस्ट हाऊस येथे दुपारी २:०० वाजता होणार आहे.

सोमवार दि.२१ जुलै रोजी बीड विधानसभा बैठक लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकातील शिवसेना कार्यालयात सकाळी ११:०० वाजता होईल. यानंतर लगेच दुपारी साडेबारा वाजता बीड शहर बैठक होणार आहे. सर्व बैठकांमध्ये संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. या बैठकींमध्ये सर्व शिवसेना महिला आघाडी युवा सेना किसान सेना ओबीसी सेल व सर्व अंगीकृत संघटनां चे पदाधिकारी तसेच आजी-माजी लोकप्रतिनिधी व प्रमुख कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हाप्रमुख अनिल जगताप, सचिन मुळूक व स्वप्निल गलधर यांनी केले आहे.

### पावसाअभावी पिके गेली,

तुर, कापुस, मुग आदी पिके पाण्याअभावी सुकुन जात आहेत. शेतकऱ्यांची अतिशय बिकट परिस्थिती झाली आहे. काही शेतकऱ्यांनी दुबार पेरणी करुनही उगवन झालेली नसल्याने दुहेरी संकट उभे राहिले आहे. शेतकऱ्यांच्या या प्रश्नाकडे लक्ष देण्यासाठी सरकारमधील मंत्री व नेत्यांना वेळ नसला तरी मी शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडणार नाही असे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जेष्ठ नेते तथा भगवान सेनेचे सरसेनापती फुलचंदराव कराड यांनी यांनी सांगितले. सोयाबिनला दिड महिन्यात फुले लागतात, पंचमीला मुगाला शेंगा येतात. मात्र पाऊस नसल्याने पीके हातची गेली आहेत. म्हणून तातडीने पिकांचे पंचनामे करावेत, पिकविम्याच्या जाचक अटी रद्द कराव्यात, शेतककरी व जनावरांना पिण्याच्या पाण्याची सोय करावी अशा मागण्या आपण शासनाकडे केल्या असल्याचे कराड यांनी सांगितले.

**बांधावर जाऊन "मैं हुं ना" सांगणार**

तालुक्यातील शेतकऱ्यांची अतिशय दयनीय अवस्था झाली आहे. त्यामुळे शेतकरी नैराश्यामध्ये जात आहे. या पार्श्वभूमीवर आपण लवकरच परळी मतदार संघाचा दौरा करणार असुन शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन "मी तुमच्या सोबत आहे" असे सांगणार आहे. शेतकऱ्यांना मदत मिळेपर्यंत आपण शांत बसणार नाही गरज पडली तर तीव्र आंदोलन करणार असल्याचा इशाराही यावेळी फुलचंद राव कराड यांनी दिला.यावेळी माऊली फड, रमेश पाळवदे, विलास आंधळे, लिबोटा सरपंच बनसोडे, रवि कराड,सुदामा मुंडे, बाबुराव राठोड,रतन पवार निकष बनसोडे ,मंचक मुंडे,अरुण दराडे,रमेश चव्हाण, माजी सरपंच महादेव कराड, वैजनाथ कराड ,सुभाष आंधळे,नामदेव आंधळे, प्रभु होळंबे, त्र्यंबक पाळवदे, रमाकांत पाळवदे, ज्ञानेश्वर आंधळे आदी शेतकरी उपस्थित होते.

**मागण्या शासनाकडे सादर करण्याचे आश्वासन**

दरम्यान आपण केलेल्या मागण्या शासनाला कळवून योग्य ती कारवाई करण्याबाबत पाठपुरावा करणार असल्याचे उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी फुलचंदराव कराड व शिष्टमंडळाला दिले.

### पत्रकारांच्या कार्यशाळेला

असलेल्या योजनांबाबत प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके माहिती देणार आहेत. या कार्यशाळेस सर्व पत्रकार बांधवांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय अरबुने, जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर, जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत आदींनी केले आहे.

### प्रवीण गायकवाड भ्याड

अन्य हिंसक प्रकारांनी जीवघेणा हल्ला केला. या घटनेच्या

निषेधार्थ पाटोदा तहसीलदार यांना काग्रेस,शेकाप शिवसेना(उबाठा) यांनी निवेदन देऊन सरकारने संबंधित आरोपींना कठोर शासन कराण्याची मागणी केली.शेकापाचे भाई विष्णुपंत घोलप, राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे तालुकाध्यक्ष राहुल जाधव, शिवसेना (उबाठा) तालुकाध्यक्ष मुकुंद शिंदे, प्रकाश वीर, निखिल पवने, सुहास मडके, निलेश गांगुर्डे, आकाश कांकरिया ,कृष्णा चौरे, बाळासाहेब गायकवाड, तालुकाध्यक्ष (वंचित बहुजन आघाडी) तुकाराम नागरगोजेसह सामाजिक कार्यकर्त्यांनी स्वाक्षऱ्या करून आपला तीव्र निषेध नोंदवला.

### भक्ती बरोबरच कर्तव्य श्रेष्ठ हे सावता

प्राणप्रतिष्ठा सोहळा कार्यक्रमासाठी खास अरणहून संत सावता महाराजांचे १७ वे वंशज ह. भ .प. रविकांत महाराज वसेकर गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड ह. भ. प. रंधवे महाराज, ह. भ. प. खरमाटे महाराज, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते डॉ. योगेश क्षीरसागर , ट्रस्टचे अध्यक्ष तथा माजी सभापती भारत यादव, ह. भ. प. लक्ष्मण महाराज, सावता परिषदेचे जिल्हाध्यक्ष किशोर राऊत, प्रसिद्ध उद्योजक चंद्रकांत काळे, ज्येष्ठ मार्गदर्शक नामदेवराव दुधाळ, प्रा. लक्ष्मण गुंजाळ, मोहनराव गोरे, पी.आर.दुधाळ, माजी नगराध्यक्ष बाबुराव दुधाळ,नगरसेवक विशाल घाडगे, सचिन दुधाळ, नितीन साखरे, अन्नदाते अनंतराव चौधरी, डॉ. रविकांत चौधरी, डॉक्टर भोपळे एड. सतीश शिंदे ,राजेश साळुंके, किरण बेद्रे,डॉ.गणेश राऊत, राजेश गवळी अदींची उपस्थिती होती. बीड शहरातील बिंदुसरा नदीच्या काठावर असलेल्या भव्य दिव्य मंदिरामध्ये विठ्ठल रुक्मिणी आणि संत शिरोमणी सावता महाराजांची मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहन सोहळा दिनांक १८ जुलै रोजी उत्साहात पार पडला. यावेळी जिल्हाभरातून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. यावेळी ह.भ.प. महादेव महाराज राऊत यांचे कीर्तन झाले या कीर्तनात त्यांनी सावता महाराजांच्या महाराजांचे श्रेष्ठत्व सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मण गुंजाळ यांनी केले. या कार्यक्रमाला जिल्हा भरातील महिला व पुरुष भाविकांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती.

### शाळेच्या खोलीस गळती

शाळेची पहिली ते पाचवीपर्यंत शाळा आहे व एक अंगणवाडी सुद्धा आहे सदर शाळेच्या इमारतीस पावसाने गळत असल्याने इमारतीवरील छत जीर्ण होऊन त्याचे. धफले पडत आहेत तर धोतरा येथील अंगणवाडी इमारत नसल्याने एका पाच पत्राच्या शेडमध्ये अंगणवाडी भरत आहे सदर शाळेला तातडीने इमारत देऊन अंगणवाडी सोय करावी अशी मागणी चौसाळाचे उपसरपंच अंकुशराव कळसे यांनी केली आहे.

----------


तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दुरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६
E-Mail ID:-tahsildarambad@gmail.com
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-७१ दिनांक-२७/०६/२०२५

**जाहीर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती सुदाम गोरखनाथ कनके रा.भांबेरी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. नाव | अर्जदाराशी नाते | जन्म / मृत्यू दिनांक |
|---|---|---|
| श्रृतीका सुदाम कनके | मुलगी | ०५/०४/२०११ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २७/०६/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दुरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६
E-Mail ID:-tahsildarambad@gmail.com
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१२८ दिनांक-१८/०७/२०२५

**जाहीर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती वैभव अर्जून इसापुरे रा.भार्डी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगा च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. नाव | अर्जदाराशी नाते | जन्म / मृत्यू दिनांक |
|---|---|---|
| आदित्य वैभव इसापुरे | मुलगा | ०७/१२/२०१९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १८/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**



तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
दुरध्वनी क्रमांक:०२४८३२७५०२६
E-Mail ID:-tahsildarambad@gmail.com
जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-१८० दिनांक-१८/०७/२०२५

**जाहीर प्रगटन**

तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती वैभव अर्जून इसापुरे रा.भार्डी ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगी च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहे त्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. नाव | अर्जदाराशी नाते | जन्म / मृत्यू दिनांक |
|---|---|---|
| शिवानी वैभव इसापुरे | मुलगी | १६/०८/२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १८/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# पुरंदर विमानतळासाठी शेतकऱ्यांचे पॅकेज ठरले

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत घेतला निर्णय

पुणे : पुरंदर विमानतळासाठी संमतीने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला असून, आता या शेतकऱ्यांचे पुनर्वसन करण्यात येणार आहे.

या शेतकऱ्यांना एकूण जमिनीच्या १० टक्के विकसित भूखंड देण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील बैठकीत घेण्यात आला आहे; तसेच रोख रक्कम म्हणून सध्याच्या दराच्या चार पट मोबदलाही देण्यात येणार आहे. या निर्णयामुळे आता शेतकऱ्यांचा विरोध संपून भूसंपादन वेगाने होईल, असा विश्वास जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी व्यक्त केला आहे. पुरंदर विमानतळासाठी वनपुरी, उदाचीवाडी, कुंभारवळण, एखतपूर, मुंजवडी, खानवडी आणि पारगाव सात गावांमधील शेतकऱ्यांकडून सुमारे २ हजार ६७३ हेक्टर जमिनीचे भूसंपादन करण्यात येणार आहे. जिल्हा प्रशासनाच्या वतीने शेतकऱ्यांना भूसंपादनासाठी नोटीस देण्यात आल्या. यानंतर शेतकऱ्यांकडून २ हजार ५२ हरकती नोंदविण्यात आल्या होत्या.



त्यानंतर या हरकतींवर सुमारे महिनाभर चाललेल्या सुनावणीदरम्यान काही शेतकऱ्यांनी विमानतळाला पाठिंबा, तर काहींनी विरोध कायम ठेवला. भूसंपादनासाठी मोबदला अजून ठरलेला नसून सरकारने पैशांसोबत जमीन द्यावी; तसेच या पॅकेजची घोषणा लवकर करावी, अशी मागणी केली जात होती. त्यानंतर शेतकरी भूसंपादन करण्यास तयार होतील असेही सांगण्यात येत होते.

या बैठकीला उपमुख्यमंत्री अजित पवार, जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील, परिवहन विभागाचे अपर मुख्य सचिव संजय सेठी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सीईओ पी वेलरासू, विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी आदी या मान्यवर उपस्थित होते.

**कुटुंबातील सदस्यांना नोकरीचीही संधी**

या प्रकल्पासाठी आता एमआयडीसीच्या २०१९ च्या पुनर्वसन कायद्याने भूसंपादन करण्यात येणार आहे. त्यात संमतीने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना या कायद्यानुसार आता १० टक्के जमिनीचा परतावा दिला जाणार आहे. हा परतावा विकसित भूखंडाच्या बदल्यात दिला जाणार आहे; तसेच रोख स्वरूपात जमिनीच्या सध्याच्या दराच्या चार पट रक्कमही दिली जाणार आहे. तसेच या व इतर प्रकल्पांत शेतकऱ्यांच्या कुटुंबातील सदस्यांना नोकरीची संधीही उपलब्ध होणार आहे.

**भूसंपादनाची प्रक्रिया तातडीने सुरू करा**

पुरंदर विमानतळासाठी सर्वेक्षण करण्यात आले आहे. त्यामुळे आता या विमानतळासाठी लागणारी जमीन संपादित करण्यासाठी आवश्यक प्रक्रिया जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने सुरू करावी, जेणेकरून विमानतळाचे काम लवकर सुरू होईल. पुरंदर विमानतळ सुरू झाल्यानंतर राज्यातील विमानतळ सेवा आणखी विस्तारणार असून भूसंपादनासाठी आवश्यक असणारी प्रक्रिया तातडीने सुरू करावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.




### महत्वाच्या घटना

१६९२ : अमेरिकेतील सेलम शहरात चेटकीण असल्याच्या आरोपाखाली स्त्रियांना फाशी देण्यात आली.
१८३२ : सर चार्ल्स हेस्टिंग्स यांनी ब्रिटिश मेडिकल असोसिएशन आणि सर्जिकल असोसिएशनची स्थापना केली.
१९०० : पॅरिस मेट्रोची पहिली सेवा सुरु झाली
१९०३ : मॉरिस गरीन यांनी पहिली टूर डी फ्रान्स स्पर्धा जिंकली.
१९०५ : लॉर्ड कर्झन यांनी बंगालच्या फाळणीची घोषणा केली.
१९३५ : जगात 'पार्किंग मीटर'चा वापर प्रथमच अमेरिकेतील ओक्लाहोमा शहरातील वाहनतळावर सुरू झाला.
१९४० : दुसरे महायुद्ध केप स्पादाची लढाई
१९४७ : म्यानमारच्या सरकारचे नियोजित पंतप्रधान आंग सान व त्यांच्या ६ मंत्री आणि २ सहकार्यांची गॅलॉन सॉ याने हत्या केली.
१९५२ : फिनलंडमधील हेलसिंकी येथे १५ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९६९ : भारतातील १४ मोठ्या बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले.
१९६९ : नील आर्मस्ट्रॉंग, एडवीन ऑल्ड्रिन व मायकेल कॉलिन्स या अंतराळवीरांसह अपोलो ११ हे अंतराळयान चंद्राच्या कक्षेत पोहोचले.
१९७६ : नेपाळमधे सागरमाथा राष्ट्रीय उद्यानाची रचना करण्यात आली.
१९८० : सोविएत युनियनमधील मॉस्को येथे २२ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
१९९२ : ऊर्दू कवी मजरुह सुलतानपुरी यांना मध्यप्रदेश सरकारतर्फे इक्बाल सन्मान पुरस्कार जाहीर
१९९३ : ग्रामीण भागातील महिलांचे जीवनमान सुधारण्यासाठी केलेल्या कार्याबद्दल डॉ. बानू कोयाजी यांना समाजसेवेसाठीचा 'रॅमन मॅगसेसे पुरस्कार' जाहीर
१९९६ : अमेरिकेतील अटलांटा येथे २६ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.
२००५ : भारताचे तत्कालीन पंतप्रधान मनमोहन सिंह यांनी अमेरिकेच्या काँग्रेसला संबोधित केलं.
२००८ : प्रशांत महासागरात आपल लक्ष्य निर्धारित करून अमेरिकेने लांब पल्ल्या मारण्यास सक्षम असलेल्या एका क्षेपणास्त्राची चाचणी केली.


### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१४ : अमेरिकन संशोधक सॅम्युअल कॉल्ट यांचा जन्म.
१८२७ : मंगल पांडे क्रांतिकारक (मृत्यू: ८ एप्रिल १८५७)
१८३४ : फ्रेंच चित्रकार एदगार देगास यांचा जन्म.
१८९६ : ए. जे. क्रोनिन स्कॉटिश लेखक (मृत्यू: ६ जानेवारी १९८१)
१८९९ : भारतीय डॉक्टर, लेखक, कवी आणि नाटककार बालाइ चांद मुखोपाध्याय यांचा जन्म. (मृत्यू: ९ फेब्रुवारी १९८९)
१९०२ : यशवंत नरसिंह केळकर कवी, कोशकार, इतिहास संशोधक, इतिहास लेखक, शाहिरी वाङ्मयाचे संग्राहक, संपादक व प्रकाशक (मृत्यू: ८ फेब्रुवारी १९९४)
१९०२ : भारतीय गायक, निर्माता, निर्माता आणि पटकथालेखक समृतरा राघवाचार्य यांचा जन्म. (मृत्यू: १६ मार्च १९६८)
१९०९ : भारतीय कवी आणि लेखक बाल्मनी अम्मा यांचा जन्म. (मृत्यू: २९ सप्टेंबर २००४)
१९२७ : थोर भारतीय स्वातंत्र्य सैनिक मंगल पांडे यांचा जन्मदिन.
१९३८ : सुप्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ आणि गणितज्ञ डॉ. जयंत विष्णू नारळीकर यांचा कोल्हापूर येथे जन्म.
१९४६ : इलि नास्तासे रोमानियन टेनिसपटू १९६४ मधे केम्ब्रिज विद्यापीठात डॉ. फ्रेड हॉईल यांच्याबरोबर संशोधन करुन गुरुत्वाकर्षणासंदर्भातील एक नवा सिद्धांत मांडला.
१९५५ : रॉजर बिन्नी क्रिकेटपटू
१९६१ : भारतीय पत्रकार आणि लेखक हर्षा भोगले यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

९३१ : उडा जपानचा सम्राट (जन्म: ५ मे ८६७)
१३०९ : संत विसोबा खेचर (संत नामदेव यांचे गुरू) समाधिस्थ झाले (जन्म:)
१८८२ : फ्रान्सिस बाल्फोर प्राण्यांच्या वर्गीकरणाविषयी मूलभूत संशोधन करणारे ब्रिटीश निसर्ग शास्त्रज्ञ (जन्म: १० नोव्हेंबर १८५१)
१९६५ : सिंगमन र्‍ही दक्षिण कोरियाचे पहिले राष्ट्राध्यक्ष (जन्म: २६ मार्च १८७५)
१९६८ : प्रतापसिंग गायकवाड बडोद्याचे महाराज
(जन्म: २९ जून १९०८)
१९८० : तुर्कस्तानचे पंतप्रधान निहात एरिम यांचे निधन.
२००४ : जपानचे पंतप्रधान झेन्को सुझुकी यांचे निधन.

# पावसात भीजलेल्या जनावरांकडे दुर्लक्ष केले तर होईल मोठे नुकसान



पावसात जर गोठा नीट झाकलेला नसेल, चाऱ्याची नीट व्यवस्था नसेल तर सर्वात मोठा फटका या मुक्या जनावरांनाच बसतो. त्यांच्या नजरेतला तो त्रास बघताना काळजाचं पाणी होतं. पावसात भिजल्यामुळे त्यांना काय काय सहन करावं लागतं, याची जाणीव असणे गरजेचे आहे. यामध्ये जनावरांचा जीव सुद्धा जावू शकतो, त्यामुळे पावसाळ्यात गुरे हे पावसात भिजू नये याची काळजी घेणे गरजेचे आहे.

पावसात भिजल्यामुळे जनावरांना होणारा त्रास व त्याचे परिणाम :

अंग थरथर कापत असतं– ताप, सर्दी, ठसक्याचा त्रास होतो. पावसात भिजलेलं अंग ताप येण्याची सुरुवात असते– पण ते सांगू शकत नाहीत. थंडीने निमोनिया होतो, फुफ्फुस बिघडतं– जीव धोक्यात येतो. पायातील ताण तणाव– चिखलामध्ये तासनतास उभं राहून पाय सडतात, सुजतात तसेच चालता येत नाही. कासेचे आजार– सड ओले राहिल्यास स्तनदाहाचा धोका संभवतो तसेच दूध दूषित होते परिणामी जनावराला वेदना सहन करता येत नाहीत. जनावराला अशक्तपणा येतो, दूध उत्पादन कमी होतं– पण तेही कुणाला सांगत नाहीत. भूक मंदावते, खाणं–पिणं कमी होतं– कारण पोट बिघडलेलं असतं. ओला चारा खाताना पचन बिघडतं– पोट फुगतं,तसेच दुखतंही. गोठा ओला असेल तर गोठ्यात जंतूसंसर्ग वाढतो– त्यामुळे गोठ्यात आजार वाढतात. चिखलात पडून पाय मोडतात, अंग दुखतं– पण ते गप्प राहतात. डोळे लाल होतात, कान सुजतात, त्वचेवर बुरशी– आणि तरीही ते शांतच राहतात. जनावरांना झोपही लागत नाही– कारण अंग सतत ओलसर आणि थंड असतं. सारखे भिजल्यामुळे जनावरे आजारी पडतात आणि हळूहळू मरणाच्या जवळ जातात– आपल्याला हे सर्व उशिरा कळतं तेव्हा फार उशीर झालेला असतो.

पावसाळा सुरू होण्यापूर्वीच गोठ्याची झाकण व्यवस्था, चाऱ्याची साठवणूक, कोरडा गोठा व स्वच्छ जागा, औषधपाणी आणि नियमित तपासणी ही सगळी काळजी आता घ्या. कधी कधी आपण वेळेत घेतलेल्या निर्णयामुळे एक जीव वाचू शकतो.

# पावसाळ्यामध्ये टोमॅटोची पुनर्लागवड करताना अशी घ्या काळजी

पावसाळ्यामध्ये टोमॅटोची पुनर्लागवड करताना काही गोष्टी लक्षात घेणे आवश्यक आहे. पावसाळ्यामध्ये जास्त पावसामुळे टोमॅटोच्या मुळांमध्ये पाणी साठून ते कुजण्याची शक्यता असते, त्यामुळे चांगली निचरा होणारी जमीन निवडणे महत्वाचे आहे. तसेच, योग्य जातीची निवड, खतांचे व्यवस्थापन आणि रोग–राईंपासून संरक्षण करणे आवश्यक आहे.

पावसाळी टोमॅटो पुनर्लागवड : शेतामध्ये सऱ्या पाडून जमिनीच्या उतारानुसार वाफे तयार करून घ्यावेत.

टोमॅटोची रोपे तयार झाल्यानंतर लागवडीच्या वाफ्यांना आठवड्यापूर्वी पाणी देऊन वाफसा स्थिती ठेवावी. लागवडीच्या दिवशी वाफ्यांना पुन्हा पाणी द्यावे. वाफ्यांमध्ये पाणी असतानाच ओल्यातच रोपांची लागवड करावी. पुनर्लागवडीपूर्वी रोपवाटिकेमध्ये साधारणतः एक आठवडा अगोदर पाण्याची मात्रा हळूहळू कमी करावी. म्हणजे रोपे कणखर होतात. लागवडीसाठी वाफ्यातून रोपे काढण्यापूर्वी एक दिवस आधी वाफ्यांना पाणी द्यावे. त्यामुळे रोपांची मुळे न तुटता रोपे




सहज निघतात. पुनर्लागवडीसाठी २५ ते ३० दिवसांची, १० ते १५ सें.मी. उंच व साधारण ६ ते ८ पाने असलेली रोपे निवडावीत. लागवडीसाठी योग्य वाढीची सशक्त रोपे निवडावीत. मरगळलेली, इजा झालेली, मुळे कमी असणारी, वाकडे व पातळ खोड असणारी तसेच रोगट रोपे पुनर्लागवडीसाठी वापरु नयेत. पुनर्लागवडीपूर्वी रोपांची मुळे इमिडाक्लोप्रिड (१७.८ एसएल) ४ मि.ली. अधिक मेटॅलॅक्झिल एम (३१.८ इएस) ६ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी या द्रावणात १०–१५ मिनिटे बुडवून घ्यावीत. नर्सरीमधून आणलेल्या रोपांच्या ट्रेमध्येच वरील द्रावणाची आळवणी करावी. (पावसाची उघडीप असताना फवारणी करावी).

# आता घरीच तपासा जनावरांचा स्तनदाह!

स्तनदाह हा पशुपालनातील सर्वाधिक आर्थिक हानी करणारा आजार आहे. स्तनदाह या आजाराला ग्रामीण भाषेत 'दगडी' आणि इंग्रजीमध्ये 'मस्टायटीस' या नावाने ओळखले जाते. दुभत्या जनावरांना होणाऱ्या या आजारामुळे पशुपालकांना खूप नुकसान सहन करावे लागते. परंतु या आजारावर एक आनंदाची बातमी आहे.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी कानपूर यांनी आधुनिक संशोधन केलेले एक नवीन किट विकसित केली आहे. 'लॅटरल फ्लो इम्युनोसे स्ट्रिप अँड मेथड फॉर डिटेक्शन ऑफ मॅस्टिटिस इन बोवाइन्स' या नावाच्या संशोधित किट द्वारे आता अवघ्या काही मिनिटात स्तनदाहचे निदान करता येणे शक्य होणार आहे.

या किटचे संशोधन रसायन अभियांत्रिकी विभाग, कानपूर आणि राष्ट्रीय केंद्राचे प्रा. सिद्धार्थ पांडा आणि डॉ. सत्येंद्र कुमार, वरिष्ठ प्रकल्प शास्त्रज्ञ यांनी केले आहे. या



तंत्रज्ञानाला भारतीय पेटंट कार्यालयाने भारतीय पेटंट क्रमांक ४५५२३२ ने मंजूर दिली असून पॉलीक्लोनल अँटीबॉडी आणि स्ट्रिप चाचणीच्या रूपात नवीन डिझाइन वापरून ही किट तयार करण्यात आली आहे. दुभत्या जनावरांमध्ये स्तनदाह शोधण्यात क्रांती घडवून आणण्याचे या अभिनव तंत्रज्ञानाचे उद्दिष्ट आहे. त्याचा व्यापक वापर सुलभ करण्यासाठी डेअरी उत्पादक कंपनीसोबत तंत्रज्ञान हस्तांतरण सामंजस्य करार देखील पूर्ण केला गेला आहे.

स्तनदाह (मस्टायटीस) हे डेअरी उद्योगांमध्ये आर्थिक नुकसानीचे एक प्रमुख कारण मानले जाते, ज्यामुळे दुधाचे उत्पादन कमी होते. तसेच दुधाची गुणवत्ता देखील खराब होते. या रोगामध्ये स्तन ग्रंथी व कासेच्या ऊतीमध्ये एक दाहक क्रिया घडते जी शारीरिक आघात किंवा सूक्ष्मजीव संसर्गामुळे होते. ज्यामुळे पशुपालकाची मोठी आर्थिक होत असते. अशावेळी ही संशोधित किट वापरून अवघ्या काही वेळात स्तनदाहचे निदान करणे सोपे होणार आहे.

किटद्वारे अशी होते तपासणी : या किटमध्ये दुधाचे काही थेंब टाकल्यावर अवघ्या काही क्षणात मस्टायटीसचे निदान होते. हाताळणीस सोप्या असलेल्या या किटद्वारे पशुपालक देखील सहजरित्या मस्टायटीसचे निदान करू शकतात.

# पोल्ट्री फार्मधील लाईट अन् त्याचे फायदे

गेल्या काही वर्षात पोल्ट्री फार्म व्यवसायात अनेक शेतकरी उतरू लागले आहेत. या व्यवसायात कमी कालावधीत अधिक नफा मिळत असल्याने दिवसेंदिवस पोल्ट्री फार्मची संख्या वाढत आहे. असे असले तरी या व्यवसायात बारीक बारीक गोष्टींचे नियोजन करावे लागते. त्यातील महत्वाचा मुद्दा म्हणजे पोल्ट्री फार्ममधील लाईट व्यवस्था.

पोल्ट्री फार्ममध्ये पिल्लांच्या वाढीसाठी लाईट व्यवस्था महत्वाची ठरते. कारण पिल्ले आणल्यानंतर त्यांना प्रकाशात ठेवावे लागते. नंतर पिल्ले मोठी होत असताना, लाईट कमी वेळ ठेवली तरी चालते. यासाठी वेळेचे व्यवस्थापन ठेवा. स्विच ऑन आणि ऑफ करण्याची वेळ पाळा, अन्यथा अचानक बदल पिल्ले तणावाखाली आणू शकतात. हेच कारण आहे की एका दिवसाच्या पिल्लाचे ४० दिवसांच्या कोंबडीमध्ये रूपांतर करण्यात लाईट खूप महत्वाची भूमिका बजावते. तसेच रोगांशी लढण्यासाठी पिलांमध्ये रोगप्रतिकारक शक्ती निर्माण करण्यामागे हे प्रमुख कारण आहे. प्रकाश व्यवस्थापन केवळ कोंबडीसाठी वाढवलेल्या पिलांनाच लागू नाही. प्रकाश व्यवस्थापन हे फार्ममधील अंड्यांसाठी लेयर फार्मिंगमध्ये वाढवलेल्या पिल्ले आणि वाढवलेल्या कोंबड्यांना देखील लागू आहे.

याचे काय फायदे आहेत? : जर तुमच्या पिल्लांचे वजन सात दिवसांनी चांगले (किमान १५० ग्रॅम) झाले तर प्रकाशाचे तास कमी करायला सुरुवात करा. दररोज एकाच वेळी पोल्ट्री फार्मचे दिवे चालू आणि बंद करा. कारण यात थोडासा बदल देखील त्रासदायक ठरू शकतो. पोल्ट्री फार्ममध्ये असा प्रकाश वापरा जो खूप तेजस्वी किंवा खूप मंद नसेल. मध्यम प्रकाश चांगला असतो. पोल्ट्री फार्ममध्ये असे बल्ब वापरा जे संपूर्ण फार्ममध्ये एकसमान प्रकाश देतात. फार्ममध्ये प्रकाश देताना सावली आणि अंधारी जागा सोडू नका, कारण यामुळे पिल्ले लपतात आणि खाद्य खात नाहीत.

पोल्ट्री फार्ममध्ये अंधारही महत्वाचा : जेव्हा पोल्ट्री फार्ममध्ये निश्चित वेळेनुसार दिवे बंद केले जातात आणि अंधार निर्माण होतो, तेव्हा पिल्ले किंवा कोंबड्या विश्रांती घेतात. आणि या काळात त्यांच्या शरीरात मेलाटोनिन नावाचा हार्मोन तयार होतो. मेलाटोनिन हार्मोनमुळे त्यांच्या शरीरात रोगप्रतिकारक शक्ती निर्माण होते आणि हा हार्मोन ताण कमी करण्यास मदत करतो. म्हणून, जर फार्ममध्ये अंधार ठेवला गेला नाही तर कोंबड्यांचे आरोग्य बिघडू शकते आणि रोगांचा धोका देखील वाढू शकतो.



# एक वर्षापासून सुरु असलेला वाद अखेर मिटला!

## ढेकनमोहा – जुजगव्हाण शिव पानंद रस्ता खुला, तहसीलदार शेळके यांच्या प्रयत्नाला यश

बीड। प्रतिनिधी

ढेकणमोहा–जुजगव्हाण शिवेवरुन जाणारा रस्ता अंतर्गत वादाने प्रलंबित राहिला होता. तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी सुनावणी घेवून तो रस्ता खुला करण्याचा आदेश दिला होता. तथापि काही शेतकऱ्यांनी आपसात असलेल्या वादामुळे शिवरस्ता होऊ दिला नव्हता. सुमारे तीन किलोमीटर रस्त्यांपैकी एक किलोमीटर रस्ता लोकसहभागातून करण्याचे राहून गेले असल्याचे शेतकऱ्यांनी तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिले. यानंतर कर्तव्यदक्ष तहसीलदार शेळके यांच्या पुढाकारातून व सस्ती अदालत या मोहिमेअंतर्गत अखेर हा रस्ता तात्काळ सामोपचाराने खुला करण्यात आला आहे.

तहसीलदार शेळके यांनी ढेकणमोहा ग्राम पंचायतला भेट देऊन गावातील लोकांच्या समस्या व पिक विमा संदर्भात अडचणी जाणून घेतल्या. गावातील लोकांचे फार्मर आयडी काढून घेण्याचे आवाहनही त्यांनी यावेळी केले. राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वसामान्य शेतकऱ्यांसाठी अनेक हिताचे निर्णय घेतले आहेत. बीडचे पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी अधिकाऱ्यांना नियमानुसार कोणालाही न घाबरता नागरिकांची, शेतकऱ्यांची कामे तात्काळ करणे बाबतची निर्देश दिलेले आहेत. विभागीय आयुक्त दिलीप जितेंद्र पापळकर यांनी ज्या ठिकाणी शेतकऱ्यांचे रस्त्याचे प्रश्न निर्माण झालेले असतील त्या ठिकाणी महसूल विभागाने वादी आणि प्रतिवादी यांच्याशी चर्चा करून सामोपचाराने रस्त्याचे प्रश्न महसूल अधिकाऱ्यांमार्फत सोडवण्यास सुरुवात केली आहे. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन हे जनता दरबार घेऊन सर्वसामान्य जनतेचे प्रश्न जागेवर सोडवत असल्याचे चित्र दिसत आहे. बीड जिल्ह्यात प्रशासन लोकोपयोगी कार्य इतक्या मोठ्या प्रमाणात केल्याचे पहिल्यांदाच दिसून येत आहे. निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे नेहमी तहसीलदारांना शेतकऱ्यांची रस्त्याची कामे तातडीने करून द्यावीत असे सांगत असतात. बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव या सर्वसामान्य जनतेप्रती अत्यंत कनवाळू आहेत. गरीब शेतकऱ्यांची कामे कोणत्याही परिस्थितीत अडविता कामा नये असा त्यांचा कटाक्ष असतो. ग्राम महसुल सज्जा ढेकणमोहा अंतर्गत येणाऱ्या मौजे ढेकणमोहा व जुजगव्हाण या दोन गावांच्या शिवेवर असणाऱ्या ब्रम्हनाथ वस्तीकडे जाणारा



पाणंद रस्त्याच्या मागणीवरून अर्जदार दादासाहेब नामदेव थापडे व इतर ७ जण यांनी तक्रार केली होती. ढेकणमोहा – नाळवंडी रोडपासून ते जुजगव्हाण तलावपर्यंत जाण्या येण्यासाठी पूर्वापार हा दक्षिण – उत्तर जाणारा रस्ता मागील अनेक वर्षापासुन गुरे, जनावरे व शेतकरी या मार्गावरून आपल्या शेतीशी निगडीत उद्योग, व्यवसाय करत आहेत. गैरअर्जदार यांनी व इतर काही शेतकऱ्यांनी हा रस्ता पूर्वापार चालत आलेला आहे, परंतु तो रस्ता पुर्णपणे आमच्या बाजुच्या शेत जमिनीमधून काढलेला आहे. असे म्हणून रस्त्याचे सुरू असलेले काम बंद करुन खडी व मुरूम टाकु न देता तो मध्येच अडवला होता. गैरअर्जदार यांच्या म्हणण्यानुसार तहसीलदार यांनी स्वतः स्थळ पाहणी केली व अर्जदार व गैरअर्जदार यांना रस्त्याचे व दळणवळणाचे महत्त्व सांगुन रस्त्यामुळे शेती उत्पादन कसे वाढवावे याकडे लक्ष देण्यास सांगितले. त्याचे महत्त्व शेतकऱ्यांना कळाले. दोन्ही बाजुच्या शेतकऱ्यांना सामोपचाराने समजावून सांगितले व मागील वर्षभरापासून चालत आलेला वाद मिटवला. जाण्या–येण्यासाठी ढेकणमोहा व जुजगव्हाण या गावच्या शिवावरुन २० फुटाचा रस्ता करावा, अशी भूमिका शेतकऱ्यांनी यावेळी घेतली.

तहसीलदार शेळके यांनी नाळवंडीचे मंडळ अधिकारी पुरुषोत्तम आंधळे व ग्राम महसूल अधिकारी जावेद शेख, ढेकणमोहा यांना सस्ती अदालत मोहिमेअंतर्गत स्थळपाहणी करण्याबाबत यापूर्वीच आदेशित केले होते. तहसीलदार शेळके यांच्या आदेशानंतर स्थानिक शेतकरी यांनी रस्ता खुला करून देण्यास कुठेही अडथळा निर्माण न करता सहकार्य केले.

यावेळी कर्तव्यदक्ष तहसीलदार शेळके, ग्राम महसूल अधिकारी जावेद शेख, सरपंच शिवाजी गाडीवान, ग्राम विकास अधिकारी बाबुराव तांदळे, उपसरपंच परमेश्वर थापडे, तंटामुक्ती अध्यक्ष कैलास देवकते, पोलीस जमादार चत्रभुज डापकर, ग्राम पंचायत सदस्य सतिश देवकते, अनंत करांडे, बळीराम थापडे, रावसाहेब थापडे, संजय शिंदे, मिलींद शिंदे, चत्रभुज थापडे, सिद्धेश्वर थापडे, दादासाहेब थापडे, गणेश थापडे, महादेव थापडे, नितीन थापडे, बापुराव थापडे, संदिपान थापडे, शिवाजी जाधव, भारत देवकते, गणेश गलांडे, रमेश गलांडे, दादा जाधव, भगवान थापडे, बालासाहेब थापडे तसेच आजूबाजूचे शेतकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक व शेतकरी यांनी तहसीलदार चंद्रकांत शेळके यांचे आभार मानले.

---

## तणावामुक्त जीवनाकरिता सकारात्मक विचारा सोबत योग व आहाराचे ही तेवढेच महत्त्व -कसबे



माजलगाव । प्रतिनिधी

तणावामुक्त जीवनाकरिता सकारात्मक विचारा सोबत योग व आहाराचे ही तेवढेच महत्त्व असल्याचे प्रतिपादन खादी ग्रामोद्योग आयोग भारत सरकारच्या ग्रीन व्हॅली विभाग व महाविद्यालयातील क्रीडा व योग विभागाच्या वतीने आयोजित एकदिवसीय कार्यशाळे प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी मंचावर खादी ग्रामोद्योग आयोगाचे श्री संजय देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उमेश साडेगावकर, प्रा दिनेश गडदे उपस्थित होते.

पुढे बोलताना रावसाहेब कसबे म्हणाले की, आजच्या धावपळीच्या जीवनामध्ये योगासने व योग्य आहार जर आपण घेतला तर आपण जीवनातील ताणतणावाचे व्यवस्थापन व्यवस्थित प्रकारे करू शकतो. आपल्याला जीवण जगत असताना अनेक भूमिका पार पाडाव्या लागतात पण शरीर स्वास्थ्य हे हसून खेळून आपण जर जीवन जगले तरच ते स्वस्त राहील. अन्यथा वेगवेगळे आजार आपल्या शरीरामध्ये प्रवेश करतील. बी.पी. शुगर यासारख्या वेगवेगळ्या आजारावर आज योग व प्राणायमाच्या माध्यमातून नियंत्रण मिळवता येते त्यासाठी त्यांनी वायु मुद्रा, अफान मुद्रा, संजीवनी मुद्रा अशा वेगवेगळ्या योगाच्या मुद्रा प्रात्यक्षिकासह शिक्षक कार्यकर्त्यांना समजावून सांगितल्या. आपल्या शरीरामध्ये निर्माण होणाऱ्या व्याधी ह्या आपणच वेळेवर आहार व व्यायामाचे अभाव यामुळे निर्माण होतात. त्यामुळे शरीराची जर काळजी आपण नीटपणे पहिल्यापासून घेतली तर आपल्या शरीरामध्ये कोणतेही आजार प्रवेश करणार नाहीत असे ते म्हणाले. यासाठी त्यांनी आपण रसायनमुक्त खाद्यपदार्थ व आयुर्वेदिक वनस्पती यांच्याकडे वळले पाहिजे त्याच आपल्याला विविध शारीरिक व्याधीपासून वाचवतील असे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी म्हणाले की, आजच्या काळामध्ये आपण आपली दैनंदिन जीवनशैली बदलली पाहिजे व तणाव मुक्त जीवन जगले पाहिजे. छोट्या छोट्या कारणामुळे आपण जर ताण तणाव घेत असो तर त्याचा निश्चितच शरीरावर वाईट परिणाम झाल्याशिवाय राहत नाही. म्हणून व्यसनाधीनतेपासून आपण सर्वप्रथम दूर असावयास हवे. त्याचबरोबर योग्य आहार, विहार व व्यायामाचे नियोजन यामुळे आपले शरीर तंदुरुस्त असेल तर कोणताही आजार आपल्या शरीरात प्रवेश करणार नाही असे ते म्हणाले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन क्रीडा विभाग प्रमुख डॉ. उमेश साडेगावकर यांनी केले तर आभार क्रीडा विभागाचे प्रा. दिनेश गडदे यांनी मानले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गजानन होंन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा.अंकुश साबळे, पर्यवेक्षक प्रा. परमेश्वर खेत्री कार्यालय अधीक्षक श्री. विजय कुलकर्णी तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

---

## मंगलाताई सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन सोहळा

### माजलगावकरांसाठी सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांची पर्वणी

माजलगाव । प्रतिनिधी

शिक्षण, मातृत्व आणि नेतृत्व यांचे प्रतीक असलेल्या सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके यांच्या ७० व्या वाढदिवसानिमित्त माजलगाव येथे एक भव्य अभिष्टचिंतन सोहळा आणि सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन २० व २१ जुलै २०२५ रोजी करण्यात आले आहे.

सविस्तर वृत्त असे की, २० जुलै २०२५ रोजी सकाळी ११ वाजता हा कार्यक्रम लोकनेते सुंदररावजी सोळंके महाविद्यालय,माजलगाव येथे संपन्न होणार आहे.या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ डॉक्टर डॉ. प्रकाशराव आनंदगावकर असतील. तर प्रमुख पाहुण्या म्हणून श्रीमती राजश्रीताई हेमंत पाटील (अध्यक्ष, गोदावरी समूह, नांदेड) यांची उपस्थिती लाभणार आहे.



या वेळी मा. आ. प्रकाशदादा सोळंके (आमदार, माजलगाव विधानसभा), मा.मोहनरावकाका सोळंके( माजी आमदार), मा. मा. राधाकृष्ण अण्णा होके पाटील( माजी आमदार), मा. बाजीराव भाऊ जगताप ( माजी आमदार), बाबुराव पोटभरे,आर.जी.बजाज, मा. जयसिंग सोळंके, मा. विरेंद्र सोळंके आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. कार्यक्रमातील सत्कारमूर्ती सौ. मंगलाताई प्रकाशदादा सोळंके या माजलगाव विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा असून मराठवाड्यात अनाथांची माऊली अशी त्यांची ओळख आहे. त्यांच्या या कार्याचा गौरव या प्रसंगी करण्यात येणार आहे. सामाजिक, शैक्षणिक आणि महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रातील त्यांचे योगदान लक्षणीय आहे. या कार्यक्रमात सकाळी १० वाजता रक्तदान शिबिराचे आयोजन करून समाजसेवेचा एक महत्वपूर्ण संदेश देण्यात येणार आहे. संध्याकाळी ६ वाजता थिएटर ऑफ रेलेव्हन्स तर्फे ''द अदर वर्ल्ड'' हा मराठी नाट्यप्रयोग सादर होणार आहे.तसेच २१ जुलै २०२५ रोजी सायंकाळी ६ वाजता गझल संध्या या गझल गायनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. श्री. दुर्गेश सोनार (मुंबई) असतील तर दत्तप्रसाद जोग, अमिता पैठणकर, आबेद शेख, आत्माराम जाधव, अविनाश काठवटे असे नामांकित गझलकार उपस्थित राहणार असून या कार्यक्रमाचे निवेदन सुप्रसिद्ध कवी प्रभाकर साळेगावकर हे करणार आहेत.आयोजनाच्या निमित्ताने विविध क्षेत्रातील मान्यवर एकत्र येणार असून, समाजसेवेचा आदर्श ठरलेल्या मंगलाताई सोळंके यांच्या कार्याचा गौरव करण्याचा हेतू आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन संयोजन समितीकडून करण्यात आले आहे.

---

## पुष्पाबाई सुलाखे यांचे निधन

बीड। प्रतिनिधी



मूळ गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील रहिवासी असलेल्या आणि हल्ली मुक्काम बीडमध्ये असलेले सेवानिवृत्त शिक्षक विश्वनाथ सुलाखे यांच्या पत्नी पुष्पाबाई वय ७० यांचे बुधवारी दुःखद निधन झाले.

पुष्पाताई विश्वनाथ (बबनराव) सुलाखे यांचे बुधवार दि १६ जुलै रोजी रात्री १० वाजता बीड येथे खाजगी रुग्णालयात उपचार घेत असताना दुःखद निधन झाले. मृत्यू समयी त्या ७० वर्षाच्या होत्या. ज्योतिषकार तथा सेवानिवृत्त शिक्षक विश्वनाथ सुलाखे यांच्या त्या पत्नी होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा डॉ.अमोल सुलाखे आणि तीन मुली,जावई,सून असा परिवार आहे. अंत्यविधी गुरुवार दि १७ रोजी सकाळी भगवानबाबा प्रतिष्ठान जवळील स्मशानभूमीत करण्यात आला.

---

## आजी–माजी आमदारांची जोडी असूनही रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागेना!

### बीड नगर परिषदेचे तर अस्तित्वच हरवले – एस.एम.युसूफ़

बीड । प्रतिनिधी

बीड विधानसभा मतदार संघाला कधी नव्हे ते एका जीवाचे आजी–माजी आमदार गेल्या काही वर्षांपासून मिळालेले आहेत. मात्र या जोडीकडून बीड शहरातील रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागत नाही आणि बीड नगर परिषदेचे तर अस्तित्वच हरवले आहे, असे उद्विग्न मत मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून व्यक्त केले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, कारंजा टॉवर, बलभीम चौक, जुना बाजार मार्गे चांदणी चौकापर्यंतचा रस्ता. राजुरी वेस ते बुंदलपुरा मार्गे कबाड गल्ली, माळीवेस पोलीस चौकी पर्यंतचा रस्ता. कारंजा टॉवर ते जुनी भाजी मंडई मार्गे बुंदलपुऱ्याचा रस्ता. बलभीम चौक ते धोंडीपुरा मार्गे माळीवेस चौक पर्यंतचा रस्ता. हे चारही रस्ते अत्यंत भयान अवस्थेत गेले आहेत. या रस्त्यावरून चालताना पादचारी, सायकलधारी, दुचाकीस्वार, तीन चाकी व चारचाकी वाहने चालविणारे अशा सर्वांनाच अक्षरशः नरक यातना भोगाव्या लागत आहेत. रस्त्यावर पडलेले शेकडो नाही तर हजारो खड्डे आणि त्यात जमणारे पावसाचे पाणी यामुळे मोठ्या प्रमाणात हाल–अपेष्टा सोसाव्या लागत आहेत. विशेष म्हणजे सध्या बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार आणि त्यांचे विश्वासू शिलेदार म्हणून ओळखले जात असलेले माजी आमदार अशी या आजी–माजी आमदारांची जोडी सोबत असूनही या चार रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागत नाही. त्यात पुन्हा अजून एक विशेष बाब म्हणजे यातील राजुरी वेस ते बुंदलपुराकडे जाणाऱ्या रस्त्यावर दस्तूरखुद्द या जोडीतील माजी आमदारांचे घर आहे. एका सोबत दुसरे मिळाल्यास जसे त्याचे मूल्य वाढते तसे बीड विधानसभा मतदारसंघातील जनतेला आजी



आमदारासोबत माजी आमदार मिळाल्याने मतदार संघाचा विकास वाढेल असे वाटत होते. परंतु बीड विधानसभा मतदार संघ तर सोडा शहरातील रस्ते व नाल्यांची दयनीय अवस्था सुद्धा सुधरताना दिसत नाही. याला बीड शहरवासियांचा कपाळ करंटेपणा म्हणावा की, या आजी–माजी आमदारांची अकार्यक्षमता? असा प्रश्न बीड शहरवासीयांमधून उपस्थित केला जात आहे. बीड नगर परिषदेला साधे शहर स्वच्छ ठेवता येत नाही तर त्याच्याकडून इतर विकास कामे होण्याची अपेक्षाच व्यर्थ आहे. असे उद्विग्न मत व्यक्त करत गेल्या काही वर्षात बीड नगर परिषदेचे अस्तित्वच हरवले असून जवळपास प्रत्येक बाबीत अक्षरशः अंधार झाला असल्याची टीकाही मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

---

**जाहीर प्रगटन**

**तहसिलदार, बोड यांचे न्यायालयात**

**जन्म नोंद दावा प्रकरण अर्ज नं. १७१७/२०२५**

तुकाराम नवनाथ घोळवे विरुध्द मुख्या. न.प.बीड १) तुकाराम नवनाथ घोळवे, रा. पिंपळगव्हाण विडा ता. केज जि. बीड

उपरोक्त प्रमाणे जन्म–मृत्यू नोंद दावा प्रकरण विधीज्ञामार्फत या कार्यालयास प्राप्त झाले असून जन्म धारक तन्मय तुकाराम घोळवे यांचा दिनांक ९/७/२०१९ रोजी जन्म झालेला असुन त्यांचे जन्म नोंद जन्म–मृत्यू नोंदवहीमध्ये घेणेबाबतच्या मागणीच्या अनुषंगाने या कार्यालयात सुनावणी सुरु आहे.

सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार यास जन्मची नोंद ग्रामपंचायत कार्यालयास/न.प.बीड ता.बीड येथील जन्म. मृत्यु रजिस्ट्ररला घेवून जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत कोणाची हरकत असेल तर ह्या जाहिरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की. जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य पुरावा घेवून त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहुन जन्म नोंद ग्रामपंचायत कार्यालय मौजे न. प. बीड ता.जि.बीड येथील जन्म–मृत्यु रजिस्ट्ररला घेवुन जन्म प्रमाणपत्र देण्याबाबत आदेशित केले जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०१/०७/२०२५ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी दिले. सदर प्रकरणात पुढील तारीख ३०/०७/२०२५ ही आहे.

**स्वाक्षरीत**
**तहसिलदार, बीड**

---

## चार संप्रेरके जी माणसाला आनंदी ठेवतात - डॉ.जगदीश टेकाळे

बीड । प्रतिनिधी

आपल्या शरीरात चार संप्रेरके असतात यांच्यामुळे आपल्याला आनंदी, प्रसन्न वाटत राहते. १) एंडॉर्फिंस २) डोपामाईन ३) सेरोटोनिन ४) ऑक्सिटोसिन. आपण ही संप्रेरके समजून घेणे महत्त्वाचे आहे, कारण आपल्याला आनंदी राहण्यासाठी या चारही संप्रेरकांची गरज आहे, असे डॉ.जगदीश टेकाळे यांनी म्हटले आहे.

इंडॉर्फिंस : आपण जेव्हा व्यायाम करतो तेव्हा हे संप्रेरक तयार होते. हे संप्रेरक शरीराला वेदना सहन करण्यास आणि दुःखावर मात करण्यास मदत करते. मग आपण व्यायामाचा आनंद घेऊ लागतो कारण इंडॉर्फिंस आपल्याला आनंदी वाटण्यास मदत करतात. हसणे हा इंडॉर्फिंस निर्मिती साठी आणखी एक चांगला मार्ग आहे.आपल्याला दररोज तीस मिनिटे व्यायाम करणे किंवा काही तरी विनोदी वाचणे ऐकणे किंवा पाहणे हे पुरेसे इंडॉर्फिंस निर्मितीसाठी मदत करू शकते.

डोपामाइन : आपल्या जीवन यात्रेत आपण अनेक लहान मोठी कामे पार पाडत असतो आणि त्यामुळे कमी जास्त प्रमाणात डोपामाइन तयार होत असते. जेव्हा आपण केलेल्या कामाचे कौतुक कोणीतरी घरी किंवा कामाच्या ठिकाणी



### आपला आनंद दिवसागणिक वाढवत नेण्यासाठी :

१) कोणतातरी खेळ खेळण्याची सवय लावून घ्या आणि खेळाचा आनंद लुटा. २) आपल्या आजूबाजूच्या लोकांचे छोट्या मोठ्या गोष्टींसाठी कौतुक करा. कौतुक करण्याची संधी कधीच दवडू नका. ३) जे काही चांगले आपल्याकडे आहे ते इतरांनाही मिळावे यासाठी जमेल तितके प्रयत्न करा.

४) जवळच्या माणसांना विना संकोच आलिंगन द्यायला शिका. यातून मिळणारा आनंद हा वाटणाऱ्या संकोचापेक्षा किती तरी पटींनी अधिक असतो. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट) न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले.

करतो तेव्हा आपल्याला सार्थक आणि आनंदी वाटते कारण तेव्हा शरीरात डोपामाइन तयार होत असते. यातून आपल्याला समजते की घरातील अनेक कामे करणाऱ्या आणि करतच राहणाऱ्या गृहिणींना अनेकदा निराश का वाटते? कारण त्यांनी केलेल्या कामाचे कौतुक फार क्वचित केले जाते. आपण जेव्हा काम करतो, पैसे मिळवतो, नवीन वस्तू खरेदी करतो तेव्हा सुद्धा डोपामाइन तयार होते. आता आपल्याला समजले का? खरेदी केल्या नंतर आपल्याला इतके उत्साही का वाटते?

सेरोटोनिन : जेव्हा पण इतरांच्या आनंदासाठी किंवा फायद्यासाठी काही करतो तेव्हा सेरोटोनिन तयार होते. जेव्हा आपण स्वार्था पलीकडे जाऊन निसर्गासाठी, समाजासाठी, इतर लोकांसाठी किंवा आप्तेष्टांसाठी काही कृती करतो तेव्हा सिरोटोनिन तयार होते. एवढेच नव्हे तर इंटरनेटवर अथवा सामाजिक जीवनात इतरांना उपयुक्त अशी माहिती पुरवणे किंवा अशा प्रकारचे लिखाण करणे यामुळे सुद्धा सिरोटोनिन तयार होते.।हे अशासाठी कारण आपण आपला बहुमूल्य वेळ इतरांना मदत करण्यासाठी खर्च करत असतो.

ऑक्सिटोसिन : हे तेव्हा तयार होते जेव्हा आपण कोणाशीही जवळीक साधतो, आपलेपणाने वागतो. जेव्हा आपण आपल्या जवळच्या एखाद्या व्यक्तीला आलिंगन देतो तेव्हा ऑक्सिटोसिन तयार होते. मुन्नाभाई सिनेमा मध्ये दाखवलेली जादू की झप्पी खरंच काम करते.

तसेच मैत्रीच्या भावनेने हात मिळवणे किंवा खांद्यावर हात ठेवणे यामुळे सुद्धा ऑक्सिटोसिन रिलीज होते. तर मित्रांनो, खूपच सोपे आहे.।दररोज व्यायाम करून इंडॉर्फिंस मिळवा, छोट्या मोठ्या पण अर्थपूर्ण अशा गोष्टी साध्य करून डोपामाइन मिळवा, इतरांना मदत करून सर्वांशी चांगले वागून बोलून सेरोटोनिन मिळवा आणि आप्तेष्टांना बिलगून ऑक्सिटोसिन मिळवा.ङ्गङ्गअशा प्रकारे तुम्ही आनंदी राहायला शिकलात, की तुम्हाला येणाऱ्या अडचणी किंवा आव्हानांना तुम्ही आत्मविश्वासाने सामोरे जाल. आता आपल्याला समजले की उदास दिसणाऱ्या एखाद्या छोटुकल्याला किंवा चिमुरडीला आपण मिठीत घेण्याची गरज असते.

# राष्ट्रीय महामार्गाच्या भूसंपादनात २२ कोटींचा घोटाळा

## उपजिल्हाधिकारी संतोष राऊत आणि नगररचनाकार चालठाणकर यांच्या संगनमताने शासनाची फसवणूक?

**बीड । प्रतिनिधी**

**राष्ट्रीय महामार्ग क्रमांक २११ साठी करण्यात आलेल्या भूसंपादन प्रक्रियेत तब्बल ₹२२ कोटी ६१ लाख ४३ हजार ७३५ रुपयाचा आर्थिक घोटाळा समोर आला आहे.या प्रकरणात तत्कालीन उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) संतोष राऊत आणि तत्कालीन नगररचनाकार चालठाणकर यांनी संगनमत करत गंभीर स्वरूपाच्या अनियमितता केल्याचे स्पष्ट झाले आहे.**

भूसंपादनाच्या निवाड्यांमध्ये अवैध अकृषिक आदेश, छायांकित प्रतीवर निर्णय, कर न भरता अकृषिक दर, आणि अवैध सुधारित दर यासारख्या विविध प्रकारांद्वारे संबंधित भूधारकांना कोट्यवधी रुपयांची अतिरिक्त नुकसानभरपाई दिली गेली.गट क्र. १४, बीड तर्फ देशमुख मधील जमीन 'अकृषिक' असल्याचे दाखवून नुकसानभरपाई ठरवण्यात आली, परंतु या जमिनीचे अकृषिक आदेश केवळ छायांकित प्रत स्वरूपात होते. महसूल अभिलेखात याचा कोणताही दाखला नाही. भूधारकांनी अकृषिक कर भरल्याचे कोणतेही पुरावे नसताना, तसेच प्रत्यक्ष बांधकामाचे कोणतेही चिन्ह नसताना देखील, शासकीय दरापेक्षा ४-५ पट जास्तीच्या अकृषिक दराने भरपाई दिली गेली.नगररचना विभागाच्या स्पष्ट विरोधात जाऊन, तहसील कार्यालयाने नगर रचनाकाराची शिफारस न घेता अकृषिक आदेश जारी केले. हे शासन परिपत्रक (१९७२ व २००१) च्या सरळ उल्लंघना समान आहे. 'सांगितलेल्या' भूखंडांसाठी भरपाई, प्रत्यक्षात जागा शेतजमीन! गट क्र. १०५, १०९, ११७, ११८, ११९, १२२, १२३, १४८ या गटांची भूखंड म्हणून भरपाई ठरवण्यात आली. मात्र गुगल इमेजेस व ७/१२ उताऱ्यांवरून ही जमीन पूर्णतः शेतीयोग्य असल्याचे स्पष्ट होते.बीड तर्फ देशमुख, शिदोड, आणि इतर निवाड्यांमध्ये केलेल्या अनियमित, बेकायदेशीर निर्णयांमुळे शासनाला एकूण ₹२२ कोटींपेक्षा अधिक रकमेचा वित्तीय भुर्दंड बसला आहे या गंभीर प्रकरणात आजपर्यंत ना चौकशी झाली, ना दोषींवर कोणतीही कारवाई, उलट काही अधिकारी तर निवृत्तीनंतर खासगी प्रकल्पांशी जोडले गेले असल्याचे वृत्त आहे. प्रश्न असा आहे की, एवढ्या मोठ्या प्रकरणावर सरकार डोळेझाक का करत आहे?

### कारवाई मात्र शून्यच-सरवदे

संबंधित प्रकरणाची किंवा एसीबीमार्फत चौकशी होणे आवश्यक आहे. तसेच संबंधित अधिकाऱ्यांची संपत्ती व आर्थिक व्यवहार तपासून शासनाची फसवणूक करणाऱ्यांवर कठोर कार्यवाही व्हावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे यांनी केली आहे.



## पावसाअभावी पिके गेली, पंचनामे करून आर्थिक मदत द्या –फुलचंदराव कराड

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

"पेरण्या होवुन दिड महिना उलटून गेला... पिके वाळून जात आहेत... तर बर्याच भागात आणखी पेरण्याच झाल्या नाहीत... सांगा बळीराजाने जगावे कसे?" असा थेट सवाल करत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जेष्ठ नेते फुलचंदराव कराड यांनी पंचनामे करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत करावी अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे.



बांधावर जाऊन ऐकणार शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे ऐकून धीर देणार असल्याचे कराड यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले.

परळी वैजनाथ तालुक्यासह बीड जिल्ह्यात दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. आज राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते फुलचंदराव कराड यांनी उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले की, सुमारे दीड महिन्यापासून पावसाने दडी मारली आहे. ज्या भागात थोडाफार पाऊस झाला त्या शेतकऱ्यांनी पेरणी केली मात्र सुमारे ४० टक्के भागात पेरणीच झाली नाही. जिथे पेरणी झाली तिथे सोयाबिन, ◀◀ पान ३ वर

## पत्रकारांच्या कार्यशाळेला उपस्थित रहा

### उबाळे, चौरे, साळुंके, घरत, आंबेकर, हांगे यांचे आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

**रविवारी माहिती जनसंपर्क विभागाच्या वतीने होणाऱ्या कार्यशाळेला मराठी पत्रकार परिषदेच्या जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी आणि सदस्यांनी उपस्थित राहून या कार्यशाळेचा आपल्या दैनंदिन कामासाठी उपयोग करावा. यासाठी रविवारी कार्यशाळेत उपस्थित राहण्याचे आवाहन मराठी पत्रकार परिषदेचे विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे, जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर ,जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय अरबुणे, जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर, जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत आदींनी केले आहे.**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या बीड जिल्हा माहिती कार्यालयाकडून जिल्ह्यातील पत्रकारांसाठी एकदिवसीय कार्यशाळा रविवार, २० जुलै २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते सकाळी १०.३० वाजता शहरातील डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथील सभागृहात होणार आहे. मूळ वर्धा जिल्ह्यातील व सध्या परभणीमध्ये जिजाऊ ज्ञानतीर्थ महाविद्यालयात शिक्षक असलेले दीपक रंगारी 'वृत्तसंकलन-संपादनात शुद्धलेखनाचे महत्त्व', माध्यम तज्ज्ञ आणि पत्रकारितेची पायवाट आणि संरक्षण पत्रकारिता या ग्रंथांचे लेखक प्रा. शिवशंकर पटवारी 'कृत्रिम बुद्धीमत्ता आणि पत्रकारिता' या विषयावर तर 'समाज माध्यमांसाठी लेखन कौशल्ये' यावर छत्रपती संभाजी नगर येथील माध्यम तज्ज्ञ डॉ. प्रभू गोरे मार्गदर्शन करणार आहेत. अधिस्वीकृती नियमावली, आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकार सन्मान योजना, शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण निधी आदी पत्रकारांसाठी ◀◀ पान ३ वर

## निवडणुकीसाठी शिवसेनेची रणनिती सुरू

### जिल्ह्यात तीन दिवस विधानसभा निहाय बैठकीचे आयोजन

### शिवसैनिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे: जगताप, मुळूक, गलधर

बीड । प्रतिनिधी

आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघात बैठकींचे आयोजन केले आहे. शिवसेनेचे मुख्य नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या आदेशानुसार, उपनेते अर्जुन खोतकर व सचिव संजय मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली, संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत १९ ते २१ जुलै या काळात विधानसभा निहाय बैठका पार पडणार आहेत.

या बैठकीत विधानसभा क्षेत्रातील पक्ष संघटन, निवडणूक रणनीती, स्थानिक कार्यकर्त्यांचा सहभाग व निवडणूकपूर्व तयारीचा आढावा घेण्यात येणार आहे. १९ रोजी सकाळी ११ वाजता माजलगाव येथे बैठक होणार आहे तर केज विधानसभा बैठक माधवबाग केज येथे दुपारी १:०० वाजता आयोजित केली आहे. परळी विधानसभेची बैठक शासकीय विश्रामगृहात दुपारी ४:०० वाजता होणार आहे. रविवार दि.२० जुलै ◀◀ पान ३ वर



## प्रवीण गायकवाड भ्याड हल्ल्याचा निषेधार्थ तहसीलदार यांना सर्वपक्षीयांचे निवेदन

पाटोदा । प्रतिनिधी

अक्कलकोट (जि. सोलापूर) येथे दिनांक १३ जुलै २०२५ रोजी शिव,शिव,शाहु, फुले , आंबेडकर अण्णाभाऊ यांच्या विचारांचे पाईक असणारे राज्यस्तरीय नेते मा. प्रवीणदादा गायकवाड यांच्यावर काही समाजकंटकांनी शाही फेकून आणि ◀◀ पान ३ वर

## शाळेच्या खोलीस गळती तर पत्र्याच्या शेडमध्ये अंगणवाडी; धोत्रा शाळेची दुर्दशा

चौसाळा । प्रतिनिधी

येथील धोतरा नामक वस्तीमध्ये जिल्हा परिषद शाळेची इमारत अक्षरशः गळत आहे छतावरील सिमेंटच्या ढपल्या जमिनीवर पडतात तर अंगणवाडी क्रमांक ८ धोतरा अंगणवाडी इमारत नसल्याने पाच पात्र्याच्या शेडमध्ये अंगणवाडी भरत असल्याची वस्तू स्थिती असल्याने ला तातडीने इमारत द्यावी व अंगणवाडी तिल बालकाची सोय करावी अशी मागणी पालक वर्गातून होत आहे सदर प्रकरणी माहिती अशी की चौसाळा येथून जवळच असलेल्या धोत्रा नामक वस्तीमध्ये जिल्हा परिषद ◀◀ पान ३ वर



## भक्ती बरोबरच कर्तव्य श्रेष्ठ हे सावता महाराजांनी दाखवले- हभप महादेव महाराज जवळेकर

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील संत सावता माळी चौक भागामध्ये संत सावता माळी महाराज यांचा प्राणप्रतिष्ठा सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला यावेळी ह.भ.प. महादेव महाराज जवळेकर यांचे कीर्तन झाले. संत सावता महाराजांनी भागवत भक्ती बरोबरच आपले कर्म ही श्रेष्ठ असल्याचे दाखवून दिले .त्यामुळे आजही पंढरीचा पांडुरंग त्यांच्या भेटीसाठी आरणला येतो आपले काम निष्ठेने करून भगवंताचे नामस्मरण करणे यामुळेच संत सावता महाराज श्रेष्ठ ठरतात असे प्रतिपादन महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार ह. भ. प. महादेव महाराज जवळेकर यांनी यावेळी झालेल्या कीर्तनात केले. या कीर्तनाला मोठ्या प्रमाणात भाविक भक्त उपस्थित होते.

या ◀◀ पान ३ वर

संत सावता महाराजांचा प्राणप्रतिष्ठा सोहळा थाटात संपन्न



## माजलगाव भाजपा शहर मंडळ निवडी जाहीर

माजलगाव । प्रतिनिधी

भाजपचे कार्यकारी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण,नामदार पंकजा मुंडे,माजी खासदार डॉ प्रीतम मुंडे यांच्या आदेशानुसार प्रदेश महामंत्री संजय केनेकर मराठवाडा संघटन मंत्री संजय कोडगे व बीड जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या सूचनेनुसार व महाराष्ट्र राज्य परिषद सदस्य अरुण राऊत,प्रदेश कार्यकारणी सदस्य डॉ.प्रशांत पाटील, माजी नगराध्यक्ष डॉ.अशोक तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली माजलगाव शहर मंडळ अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी प्रसिद्ध पत्रकाच्याद्वारे जाहीर केली असून यामध्ये बाळासाहेब क्षीरसागर,रामेश्वर चव्हाण,उमेश जाधव,अविनाश कांडूरे,छाया कुलकर्णी,पुजा मुंडकर असे सहा उपाध्यक्ष तर पवन मोगरेकर,कैलास खुरपे,असे दोन सरचिटणीस, विनोद लड्डा,मनोज कोरडे,संतोष जाधव,सुभाष कांबळे,चित्रा पाठक,अनिता अलकुंटे,असे सहा चिटणीस,आनंद कुलकर्णी कोषाध्यक्ष व ४६ कार्यकारणी सदस्य अशा एकूण ६१ निवडी जाहीर करण्यात आलेल्या आहेत.नामदार पंकजा मुंडे,माजी खासदार डॉ.प्रीतमताई मुंडे, व सर्व नेतेगण सर्व पदाधिकारी यांनी निवड झालेल्या सर्व कार्यकारणीतील पदाधिकाऱ्यांचे व कार्यकारिणी सदस्यांचे अभिनंदन करुन आपल्या हातून पक्ष संघटनेच्या माध्यमातून देश सेवा,समाजसेवा घडो अशा पुढील वाटचालीस नवनियुक्त कार्यकारणीला हार्दिक शुभेच्छा दिल्या.

## शंभर निराधारांना किराणा साहित्त्याचे वाटप

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दात्यांच्या अर्थ साहाय्यातुन ऐंशी वृध्द निराधारांना मान्यवरांच्या हस्ते किराणा किट वाटप करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून बागझरीचे सरपंच प्रशांत दहिफळे, पत्रकार राहूल देशपांडे, रामकृष्ण गो शाळेचे संचालक संतोष गिरी,अरुण आसरडोहकर आदी उपस्थित होते.

प्रशांत दहिफळे म्हणाले की, हाल अपेष्टात जीवन जगत असताना अनेक संकटांशी सामना करावा लागतो प्रामुख्याने रोजी रोटीचा प्रश्न गंभीर असून याच प्रश्नासाठी मानवलोक संस्थेच्या माध्यमातून समाजातील दानशुर व्यक्ति मदत करतात राहूल देशपांडे म्हणाले की, दानशुरांनी केलेल्या मदतीच्या माध्यमातून सर्वांना महिन्याला किराणा साहित्य वाटप होते आणि त्यांच्या रोजी रोटीचा प्रश्न सुटतो. दानशूर व्यक्तींच्या अर्थ साहाय्यातुन वृध्द,अपंग,अंध,निराधार आजारग्रस्त उपेक्षितांसाठी मानवलोक सेवाभावी संस्था कार्य करत असल्याचे प्रास्तविकातून शाम सरवदे यांनी सांगितले. सुरुवातीला संजना आपेट,सावित्री सागरे यांनी स्वागतगीत गायिले.







This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बेकायदा होर्डिंग्जला अभय देणे भोवले; नगर रोड वडगाव शेरीच्या आकाशचिन्ह परवाना निरीक्षकांचे निलंबन

**पुणे । प्रतिनिधी**

शहरातील अनधिकृत होर्डिंगला अभय देणार्या अधिकारी आणि कर्मचार्यांवर प्रशासनाने आता कारवाईचा बडगा उगारला आहे. नगर रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीतील अनधिकृत होर्डिंगची खोटी आकडेवारी देणार्या वरिष्ठ निरीक्षकावर निलंबनाची कारवाई करण्यात आली असून, कनिष्ठ लिपिकाची जुलै महिन्याची वेतनवाढ रोखण्यात आली आहे.




महापालिका आयुक्त नवलकिशोर राम यांनी आयुक्तपदी पदभार स्वीकारल्यानंतर पहिल्याच दिवशी अनधिकृत होर्डिंगवर कारवाई करण्याची ठोस भूमिका जाहीर केली होती. त्यानुसार त्यांनी प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाकडून त्यांच्या हद्दीत नक्की किती अनधिकृत होर्डिंग आहेत, याची माहिती मागविली होती.

यांची वेतनवाढ रोखण्यात आली असल्याचे वरिष्ठ अधिकार्यांकडून सांगण्यात आले. त्यात १५ क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत केवळ २४ च अनधिकृत होर्डिंग असल्याचे संबंधित क्षेत्रीय कार्यालयाच्या निरीक्षकांकडून कळविण्यात आले होते. त्यात नगर रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत ७ अनधिकृत होर्डिंग असल्याचे सांगण्यात आले होते. दरम्यान, निरीक्षकांनी पाठविलेल्या आकडेवारीची सत्यता तपासण्यासाठी मुख्य खात्याकडून स्वतंत्र पथकामार्फत तपासणी करण्यात आली. त्यात नगर रोड क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीत ३५ अनधिकृत होर्डिंग असल्याचे आढळून आले होते.

त्यावर या क्षेत्रीय कार्यालयाचे वरिष्ठ परवाना निरीक्षक विनोद लांडगे आणि कनिष्ठ लिपिक राजेंद्र केवटे यांच्याकडून आकाशचिन्ह परवाना निरीक्षकांनी खुलासा मागविला होता. मात्र, लांडगे आणि केवटे यांनी दिशाभूल करणारा खुलासा देऊन अनधिकृत होर्डिंगला पाठीशी घातले असल्याचे स्पष्ट झाल्याने लांडगे यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

# स्मार्ट वीजमीटरने ग्राहकांना सातपट वाढीव बिले!

## नागरिकांनी व्यक्त केला संताप

**पुणे । प्रतिनिधी**

फुरसुंगी भेकराईनगर, फुरसुंगी, उरुळी देवाचीसह परिसरात महावितरण कंपनीने बसविलेल्या टी. ओ. डी. स्मार्ट वीजमीटरमुळे सातपट वाढीव वीजबिले आल्याने नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. ही बिले कमी करून मिळावीत आणि स्मार्ट मीटर बसविणे तत्काळ थांबवावे, अशी मागणी ग्राहकांनी केली आहे. याबाबत कार्यवाही न झाल्यास आंदोलनाचा इशाराही देण्यात आला आहे.



वाढीव वीजबिलामुळे भेकराईनगर परिसरातील रहिवाशांमध्ये संतापाची लाट पसरली असून, त्यांनी महावितरणच्या कार्यालयावर जाऊन याबाबत अधिकार्यांना जाब विचारला. नवे मीटर बसविण्यापूर्वी हजार रुपये बिल येत होते, आता सहा-सात हजारांपेक्षा जास्त बिल येत आहे.

मुलांच्या शिक्षणाचा खर्च, अचानक वाढलेले बिल आणि महागाईमुळे नागरिक हैराण झाले आहेत. त्यात वेळेवर बिल भरले नाही, तर महावितरणकडून वीजपुरवठा खंडित केला जात असल्यामुळे रहिवासी हतबल झाले आहेत.

याबाबत माजी नगरसेवक गणेश ढोरे म्हणाले की, परिसरात स्मार्ट मीटर बसविण्याअगोदर ज्यांना ७०० ते १५०० वीज बिल येत होते, त्यांना आता ७ हजार ते १४ हजार बिल येत आहे. ज्यांचा पगारच १० ते १५ हजार आहे, त्यांनी वीज बिल भरून कुंटुबाच्या उदानिर्वाहाचा खर्च कसा करायचा, काय खायचे आणि मुलांना शाळा कशी शिकवायची, असा प्रश्न निर्माण झाला आहे.

महावितरणने ग्राहकांची बिले तातडीने कमी करून द्यावी आणि स्मार्ट मीटर बसविणे थांबवावे, यासाठी नागरिकांच्या वतीने स्थानिक आमदार आणि पालकमंत्री अजित पवार यांच्या कडेही पाठपुरावा केला जाणार आहे.

...मग आधीचे मीटर सदोष कसे?

वाढीव वीजबिलांबाबत महावितरणच्या अधिकार्यांना प्रश्न विचारला असता त्यांनी आधीचे मीटर फॉल्टी होते, त्यामुळे वीजबिल कमी येत होते, असे अजब उत्तर दिले. मात्र, आधीचे मीटर ग्राहकांनी बाजारातून विकत आणले नव्हते, तर ते महावितरण कंपनीनेच बसविले होते, मग ते सदोष कसे, असा सवाल माजी नगरसेवक गणेश ढोरे यांनी उपस्थित केला आहे.

# पुण्यात धक्कादायक प्रकार: सराईत गुंडाने सहकारनगर पोलीस ठाण्यात घातला राडा, घटनेने खळबळ

**पुणे । प्रतिनिधी**

सहकारनगर पोलिस ठाण्यात गुरुवारी मध्यरात्री सराईत गुन्हेगार बारक्या लोंढे याने चांगलाच हैदोस घातला. पोलिसांच्या तोंडावर मिर्ची स्प्रे मारत त्याने पोलिस ठाण्यात तोडफोड केली, काचा फोडल्या आणि स्वतःला जखमी करून घेतले. या घटनेत चार ते पाच पोलिसांना श्वसनाचा त्रास जाणवला असून, रात्रभर ठाण्यात गोंधळाचे वातावरण होते.




गुन्हेगाराने पोलिस ठाण्यात घरात घुसून मर्डर करण्याची धमकी दिली. या साऱ्या घटनेनंतर देखील वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि गुन्हे शाखेचे निरीक्षक ठाण्यात उपस्थित नव्हते, ही बाब विशेष लक्षवेधी ठरली आहे. घटनास्थळी केवळ रात्रगस्तीचे सहाय्यक पोलीस आयुक्त राहुल आवारे दाखल झाले, मात्र त्यांनी कोणतीही ठोस कारवाई केल्याचे दिसून आले नाही.

रक्तबंबाळ अवस्थेतील गुन्हेगाराला पहाटे चार वाजता तपास पथकाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी ससून रुग्णालयात दाखल केले. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, आरोपीला काबूत आणताना आणि सांभाळताना पोलिसांना अक्षरशः नाकीनऊ आले.

वरिष्ठांकडून मदतीचा अभाव आणि पोलिस ठाण्यातील अपुऱ्या सुविधा यामुळे या घटनेने पुणे पोलिस दलाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

# पिंपरीत तिसर्या मजल्यावरुन पडल्याने कामगाराचा मृत्यू; दुसरा कामगार गंभीर जखमी

**पिंपरी । प्रतिनिधी**

बांधकाम सुरु असलेल्या इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर काम चालू असताना दोन कामगार खाली पडले. त्यातील एका मजुराचा मृत्यू झाला तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. चंद्रकांत यशवंत सुतार (वय ५३, रा. वडगाव रोड, आळंदी) यांचा मृत्यू झाला तर निरहार भिमन्ना मेलकेरी (४३, रा. चह्योली (बु) ता. हवेली) हे गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना अरविंद सोळंकी यांच्या चऱ्होली-आळंदी रोड, आळंदी येथील साईटवर घडली.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ठेकेदाराने इमारतीच्या बाहेरील बाजूने मजुराच्या व पादचाऱ्याच्या सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक असणारी संरक्षण जाळी लावली नाही. मजुरांच्या सुरक्षेची खबरदारी म्हणून डोक्याला हेल्मेट व हर्नेस दिले नाही आणि त्यांच्या जीविताची योग्य ती खबरदारी न घेतल्याने व निष्काळजीपणा केल्याने हा प्रकार घडला. आळंदी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक राहुल दुधमल यांनी आरोपी अब्दुलगफार अब्बास राय (वय ५२ वर्षे रा. चर्होली खुर्द घोलपवस्ती ता खेड जि पुणे) याच्याविरोधात फिर्याद दिली आहे. आळंदी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला अद्याप अटक झाली नाही. यापूर्वी अशा अनेक घटना समोर आल्या आहेत. पुण्यातील कोंढवा भागात सुरू असलेल्या बहुमजली बांधकाम इमारतीच्या सातव्या मजल्यावरून लिफ्टच्या डक्टमधून खाली पडून एका मजूराचा मृत्यू झाला होता. ही धक्कादायक घटना उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांनी एकावर गुन्हा नोंदवला आहे. सनी डाक्टर सोनी (वय १९, रा. टिळेकरनगर) असे मृत्यू झालेल्या मजुराचे नाव आहे. याप्रकरणी कोंढवा पोलीस ठाण्यात डॉक्टर सोनी यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार, गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# इंदापुरात भाजपवाढीसाठी प्रवीण मानेंना बळ देणार; मुरलीधर मोहोळ यांचे प्रतिपादन

**इंदापूर । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेचे माजी बांधकाम व आरोग्य सभापती तसेच सोनाई उद्योग समूहाचे संचालक प्रवीण माने यांच्या भारतीय जनता पार्टीत प्रवेशामुळे पक्षाला चालना मिळाली आहे. पक्ष वाढीसाठी प्रवीण माने यांना बळ देणार असल्याची ग्वाही केंद्रीय सहकार व नागरी उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी दिली.



गुरुवारी (दि. १७) केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ यांनी प्रवीण माने यांच्या इंदापूर शहरातील निवासस्थानी सदिच्छा भेट दिली, या वेळी ते बोलत होते. सोनाई उद्योग समूहाचे प्रमुख दशरथ माने यांनी मंत्री मोहोळ यांचा सत्कार केला.

केंद्रीय राज्यमंत्री मोहोळ म्हणाले, माने यांनी भाजपात प्रवेश केला, त्यांचे स्वागत आहे. त्यांचे सामाजिक काम उल्लेखनीय आहे. त्यांच्यामुळे पक्षाची ताकद वाढली असून योग्य दिशादर्शक पक्षप्रवेश ठरला आहे. आगामी निवडणुकांमध्ये देखील याचा निश्चितच फायदा होणार आहे. माने कुटुंबाने हजारो बेरोजगार, महिलांना विविध उद्योगातून हाताला काम देऊन यातून रोजगारनिर्मिती करीत अनेकांचे प्रपंच उभे केले आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भेटीला महत्त्व पुणे जिल्ह्यात भारतीय जनता पार्टीमध्ये अनेक पक्षप्रवेश होत आहेत. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर हे पक्षप्रवेश महत्त्वाचे मानले जात आहेत. जिल्हा परिषदेवर भाजपाची सत्ता आणण्यासाठी मंत्री, पदाधिकारी यांच्या भेटी महत्त्वाच्या मानल्या जात आहेत.

# पुण्यात नशेच्या गोळ्यांचा साठा पकडला ; आरोपीकडून ५.७४ लाखांच्या मेथाम्फेटामाइन गोळ्या जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

बेकायदेशीरपणे शक्तीशाली आणि उत्तेजक मानल्या जाणाऱ्या, तसेच डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शनशिवाय विक्रकी करण्यास मनाई असणाऱ्या मेथाम्फेटामाइन गोळ्यांची विक्री करणाऱ्यास फरासखाना पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्या ताब्यातून तब्बल ५ लाख ७४ हजार रुपयांच्या गोळ्या जप्त करण्यात आल्या आहेत. आरोपी मूळचा बंगलोर येथील आहे. निशान हबीबमंडल (४७, रा. बंगळुरू, कर्नाटक) असे आरोपीचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस शिपाई गजानन सोनुने यांनी तक्रार दाखल केली आहे.



आरोपी हबीबमंडल हा बंगलोरमध्ये मागील वीस वर्षांपासून आयात-निर्यातीचा व्यवसाय करत आहे. या व्यवसायात तोटा झाल्याने हे बेकायदा कृत्य केल्याचे त्याचे म्हणणे आहे. मात्र, पोलीस त्याचे वक्तव्य पडताळून पाहात आहेत. त्याने या गोळ्या पश्चिम बंगाल येथून पार्सलद्वारे मागवल्या होत्या. त्यानंतर त्या घेऊन तो पुणे शहरात आला होता. त्याची विक्री करण्याआधीच त्याला अटक करण्यात आले आहे. येथे तो त्याची विक्री कोणाला करणार होता, याचा तपास केला जात असल्याची माहिती सहायक पोलीस निरीक्षक शीतल जाधव यांनी दिली. ही गोळी डॉक्टर अतिक्रियाशीलता विकार, नाइट फॉल आणि लठ्ठपणाच्या उपचारासाठी वापरतात. डॉक्टरांच्या मार्गदर्शनाखालीच गोळीचा वापर केला जातो. मात्र, जिममधील काही तरुण बॉडी बिल्डिंगसाठी, तर काही नशेखोर नशेसाठी याचा वापर करतात. याचे सेवन केल्यास मेंदूमध्ये असणारे डोपामाइन (नैसर्गिक रसायन) सिक्रीशन वाढतं. अर्थात हे रसायन मेंदूत स्रवतं. डोपामाइनच्या सिक्रीशनमुळे तुमच्या मनात समाधान आणि आनंदाची भावना निर्माण होते. मात्र, जेव्हा ते मोठ्या प्रमाणावर स्रवतं तेव्हा सेवन करणाऱ्या व्यक्तीत एनर्जी वाढते आणि जास्त उत्साही झाल्यासारखं वाटतं. स्वतःला आनंदी आणि उत्साही ठेवण्याच्या नादात लोक मेथाम्फेटामाइनचा वापर करतात. पुढे ही सवय व्यसनात बदलते; पण याच्या अतिवापरामुळे मृत्यू ओढवू शकतो.अमेरिकेतील तरुणांमध्ये या ड्रग्जची नशा सर्रास केली जाते.

# मंत्राद्वारे तुला बकरी बनवेल धमकी देत मांत्रिकाकडून विधवा महिलेची २.६० लाखांची फसवणूक

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील उच्चभ्रू कोरेगाव पार्क भागात एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. स्वतःला तांत्रिक असल्याचे भासवून एकाने विधवा महिलेची २ लाख ६० हजार रुपयांची फसवणूक केली. याप्रकरणी कोरेगाव पार्क पोलिसांनी मोहम्मद खांसाहिब जान मदारी या व्यक्तीला अटक केली आहे. त्याने ही घटना कोणास सांगितल्यास महिलेला मंत्राद्वारे तुला बकरी बनवेल, अशी धमकी दिली होती.



फिर्यादी महिला कोथरूड परिसरातील असून, ती दोन मुलांची आई आहे. आर्थिक अडचणींमुळे मदतीच्या शोधात असताना, एका ओळखीच्या महिलेमार्फत तिचा परिचय मदारीशी झाला. मदारीने तिला सांगितले की, तो तांत्रिक उपायांनी सोन्याचा हंडा तिच्यासाठी आणणार असून, त्यामुळे तिचे आर्थिक भाग्य पालटेल.


यासाठी त्याने महिलेला विशिष्ट पूजा करण्यास सांगितले आणि त्या बदल्यात २ लाख ६० हजार रुपये घेतले. त्यानंतर मदारीने पूजा करून एक काळ्या कपड्यात गुंडाळलेला माठ तिला दिला व तिला १७ दिवसांनी रात्री ११ वाजून २१ मिनिटांनी तो उघडण्यास सांगितले. महिलेने सांगितलेल्या वेळेनुसार माठ उघडला असता, त्यात केवळ माती आढळली. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच तिने मदारीशी संपर्क साधला. मदारीने तिला १६ जुलैला सायंकाळी घरी बोलावले.


पोलिसांनी आधीच सापळा रचून ठेवलेला असल्याने, त्याच ठिकाणी मदारीला अटक करण्यात आली. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील थोपटे, पोलीस निरीक्षक (गुन्हे), संगीता जाधव, सहायक पोलीस निरीक्षक शिल्पा निमकर, पोलीस हवालदार प्रवीण पडवळ, मयूर शिंदे आणि विवेक जाधव यांच्या पथकाने केली. या प्रकरणात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(२) आणि अंधश्रद्धा निर्मूलन व जादूटोणा प्रतिबंधक कायदा कलम ३(२) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीला न्यायालयात हजर केल्यानंतर १९ जुलैपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

# बारामतीत बँक मॅनेजरने गळ्याला दोर लावून आयुष्य संपवलं

**बारामती । प्रतिनिधी**

बारामतीतीत एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. बँकेच्या मॅनेजरने बँकेतच गळफास घेतल्याची धक्कादायक घटना बारामतीमध्ये घडली आहे. बारामतीमध्ये बँक ऑफ बडोदाच्या शाखा व्यवस्थापकानं आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. बारामतीमधील भिगवण रोडवरील बँक ऑफ बडोदाच्या शाखेत व्यवस्थापक शिवशंकर मित्रा यांनी काल (गुरूवारी, ता १८) गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. शिवशंकर मित्रा असे मॅनेजरचे नाव आहे. मित्रा हे मूळचे उत्तर प्रदेशचे रहिवासी आहेत. त्यांनी आत्महत्येपूर्वी एक चिठ्ठी देखील लिहली आहे. बँकेच्या दबावामुळे मी आत्महत्या करत असल्याचं सुसाईड नोटमध्ये मित्रा यांनी म्हटलं आहे.





मृत्यूपूर्वी लिहलेल्या चिठ्ठीत शिवशंकर मित्रा यांनी म्हटलंय, मी शिवशंकर मित्रा, बँक ऑफ बडोदाच्या शाखा व्यवस्थापक बारामती, मी आज बँकेच्या अतिरिक्त दबावामुळे आत्महत्या करत आहे, माझं बँकेला आवाहन आहे की, कर्मचाऱ्यांवर इतका दबाव टाकू नये. सर्वांना आपल्या जबाबादाऱ्यांची जाणीव आहे, प्रत्येक जण आपलं १०० टक्के देण्याचा प्रयत्न करतोय. मी पुर्णपणे जाणीवपूर्वक माझ्या स्वेच्छेने आत्महत्या करत आहे. माझ्या कुटुंबाची यात कोणतीही जबाबदारी नाही. बँकेच्या प्रचंड दबावामुळे मी हे करत आहे. बायको प्रिया, मला माफ करा, माही माझी मुलगी, मला माफ कर. शक्य असल्यास, कृपया माझे दोन्ही डोळे दान करा, असं शिवशंकर मित्रा यांनी आपल्या सुसाईड नोटमध्ये म्हटलं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, शिवशंकर मित्रा हे मूळ उत्तर प्रदेशातील प्रयागराज येथील आहेत, ते गेली अनेक वर्ष बँक ऑफ बडोदाच्या शाखा व्यवस्थापक म्हणून काम करत आहेत. मात्र कामाच्या ठिकाणी मोठा दबाव असल्याने गेल्या काही दिवसांपासून शिवशंकर मित्र तणावाखाली होते. त्यांनी या संदर्भात घरच्यांशी चर्चा केल्यानंतर स्वेच्छानिवृत्ती घेण्याचा निर्णय घेतला होता. पाच-सहा दिवसापूर्वीच त्यांनी बँकेकडे स्वेच्छानिवृत्तीचा अर्ज केला होता, मात्र त्याला कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. त्यांना ही नोकरी सोडायची होती, ते अनेक दिवस वरिष्ठांना अतिरिक्त दबाव टाकू नका असे म्हणत होते, मात्र कोणीच ऐकले नाही. त्यामुळे काल रात्री उशिरा त्यांनी सुसाईड नोट लिहीत आत्महत्या केली. यामध्ये त्यांनी बँकेच्या अतिरिक्त दबावामुळे आपण आत्महत्या करत आहोत असे स्पष्ट केले आहे.

भिगवण रस्त्यावरील 'बँक ऑफ बडोदा' बँकेच्या शाखेत काल (गुरुवारी) शिवशंकर मित्रा यांनी रात्री उशिरा आपलं जीवन संपवलं. बँकेचे वरिष्ठ व्यवस्थापक शिवशंकर मित्रा यांनी गळफास घेऊन आयुष्याचा शेवट केला. सुसाईड नोटमध्ये त्यांनी आपल्यावरील अतिरिक्त दबावाचा उल्लेख केला आहे. या घटनेनं शहरात खळबळ उडाली आहे. आपल्या मृत्यूनंतर आपले नेत्र दान करावेत अशी इच्छा त्यांनी व्यक्त केल्यामुळे सर्वजण भावूक झाले. त्याचबरोबर त्यांनी आपल्या सुसाईड नोटमध्ये आपल्यासोबत काम करणाऱ्यांवर दबाव टाकू नका असंही म्हटलं आहे.

# लोहगाव विमानतळावरून बुकिंग रद्द करणाऱ्या कॅब चालकांना 'नो एन्ट्री' ; एरोमॉल प्रशासनाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**पुणे । प्रतिनिधी**

लोहगाव विमानतळाच्या समोर असलेल्या एरोमॉलमध्ये काही कॅबचालक प्रवाशांनी केलेली बुकिंग वारंवार रद्द करत आहे. त्यामुळे प्रवाशांची मोठी गैरसोय होत असल्याच्या प्रवाशांच्या वारंवार तक्रारी येत आहे. याची गंभीर दखल घेत एरोमॉल प्रशासनाने आता अशा कॅब चालकांवर कारवाई करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांना एरोमॉल परिसरात प्रवेश दिला जाणार नसल्याचे एरोमॉल प्रशासनाने जाहीर केले आहे.



लोहगाव विमानतळावरून प्रवासी उतरल्यानंतर प्रवाशांनी कॅब बुक केल्यानंतर काही चालक त्यांना जर जवळ सोडायचे असल्यास ते बुकिंग रद्द करत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी असा प्रकार घडत असल्याने प्रवासी हतबल ठरत आहे. शिवाय काही चालक जास्तीची रक्कम घेत असल्याने प्रवाशांनी त्याबद्दल देखील नाराजी व्यक्त केली आहे. या सर्वांची गंभीर दखल एरोमॉल प्रशासनाने घेतली आहे. यापूर्वी देखील असा प्रकार घडला होता. मात्र, त्यावेळी चालकांना समज देण्यात आली होती. आता मात्र थेट कारवाईचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत बोलताना लोहगाव एरोमॉलचे उपाध्यक्ष युवराजसिंग राजपूत म्हणाले, बुकिंग रद्द करणाऱ्या चालकांना दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागणार असून, अशा वाहनांना एरोमॉलमध्ये प्रवेश नाकारण्यात येईल. प्रवाशांना विश्वासार्ह सेवा देण्याच्या दृष्टीने हा निर्णय घेतला आहे.

एरोमॉल प्रशासनाच्या अंतर्गत सर्वेक्षणानुसार, मागील दोन आठवड्यांत एकूण कॅब बुकिंगपैकी सुमारे ३० टक्के बुकिंग चालकांनी रद्द केली. काही चालकांनी प्रवाशांचा लोकेशन पाहून किंवा पेमेंट मोड न पटल्यास बुकिंग नाकारल्याचे आढळून आले आहे. यामुळे प्रवासी सेवा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले.